मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ ■ अंक : ३०६ ■ रविवार, १९ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# सोनम वांगचुक यांना पोलिसांनी रुग्णालयात केलं दाखल, जंतर मंतरवरुन आंदोलकांना हटवलं



**नवी दिल्ली-** परीक्षेतील कथित फेरफार आणि अनियमिततेच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर इथे उपोषणाला बसलेल्या पर्यावरणशास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांना आंदोलन स्थळावरुन हटवण्यात आलं आहे. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आजचा 21वा दिवस होता. मात्र, आंदोलनस्थळावरुन हटवून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पोलिसांचा मोठा बंदोबस्त जंतर-मंतरवर तैनात केला आहे. पोलिसांनी केलेल्या मोठ्या कारवाईनंतर जंतर-मंतरवर मोठा गोंधळ पाहायला मिळतोय. आंदोलनकर्ते आक्रमक झाल्याचंही पाहायला मिळत आहे.

सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात दाखल केलं - जंतर-मंतरवर गेल्या 20 दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या सोनम वांगचुक यांना पोलिसांनी रुग्णालयात नेल्यानंतर तेथील निदर्शकांना आंदोलनस्थळावरून हटवण्यात आलं आहे. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांना आपत्कालीन विभागात दाखल करण्यात आलं आहे. ते शुद्धीवर असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

सोनम वांगचुक यांना रुग्णालयात केलं दाखल - नवी दिल्लीचे डीसीपी सचिन शर्मा म्हणाले, "माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत, तसेच आरोग्यविषयक स्थिती आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार, सोनम वांगचुक यांना अत्यंत आवश्यक वैद्यकीय उपचारांसाठी येथून एका योग्य सरकारी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. ते सध्या वैद्यकीय देखरेखीखाली आहेत."

**आंदोलकांनी केले आरोप** - "सकाळी-सकाळी सुमारे दहा पोलीस अधिकारी आले आणि ते वैद्यकीय पथक असल्याचं सांगितलं. ते डॉक्टरसारखे दिसत नसल्यामुळं आणि त्यांनी सर्व स्वयंसेवकांना बाजूला होण्यास सांगितल्यामुळं ते पोलीस आहेत हे आमच्या लक्षात आलं. आम्ही त्यांना थांबण्याची विनंती करत राहिलो, पण अचानक त्यांनी सांगितलं की, सोनम वांगचुक यांना घेऊन जाण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश आहे," अशी माहिती उपस्थित आंदोलकांनी दिली. "अभिजीत दिपके याला अटक केली आहे, म्हणूनच तो इथे येऊ शकत नाही आणि त्याचा फोनही लागत नाहीये. सर्व पोलीस साध्या वेशभूषेत होते," अशी शंका आंदोलकांनी व्यक्त केली.

'उच्च न्यायालयाचे आदेश आणि वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला लक्षात घेऊन, सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना आवश्यक वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. जंतर मंतर येथील आंदोलकांना विनंती करतो की, त्यांनी लवकरात लवकर आणि शांततापूर्ण मार्गाने ती जागा रिकामी करावी.'
- दिल्ली पोलीस

'दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तसंच वैद्यकीय पथकांच्या देखरेखीखाली सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केलं आहे.'
- सचिन शर्मा, डीसीपी, दिल्ली पोलीस

## अभिजीत दीपकेंवर महिलेनं फेकली शाई

**नवी दिल्ली :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीकडून (CJP) दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन सुरूच आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून गेल्या 20 दिवसांपासून याठिकाणी उपोषणासाठी बसलेले पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी जबरदस्तीनं हटवून सफदरजंग रुग्णालयात दाखल केलं आहे. त्यामुळं सकाळपासून येथील वातावरण तापलं आहे. अशात जंतर-मंतरवर एका महिलेनं कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्यावर शाई



फेकल्यानं आंदोलनस्थळी गोंधळ निर्माण झाला. मात्र, उपस्थित लोकांनी त्या महिलेला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं. पोलीस त्या महिलेची चौकशी करत आहेत.

**अभिजीत दीपके यांनी उपोषणाची केली घोषणा :** शाईच्या हल्ल्यानंतर अभिजीत दीपके यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट लिहिली आहे. ज्यात त्यांनी म्हटलं आहे की, "निळा माझा आवडता रंग आहे." दरम्यान, यापूर्वी, आंदोलकांना संबोधित करताना अभिजीत दीपके यांनी उपोषणाला बसणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळं अभिजीत दीपके यांच्या घोषणेमुळं दिल्ली पोलिसांच्या रणनीतीसमोर एक नवीन आणि मोठं आव्हान उभे राहिलं आहे. आंदोलक आपल्या मागण्यांवर ठाम आहेत, विशेषतः शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा आणि देशाच्या ढिसाळ परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याची मागणी करत आहेत. तसंच दडपशाहीच्या धोरणांपुढं आपण झुकणार नाही, असं आंदोलकांचं म्हणणं आहे.







## काँग्रेसच्या रायगड जिल्हा महिला पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

**दैनिक युवक आधार**

**उलवे,प्रतिनिधी :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या महिला अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या नियुक्त्या नुकत्याच करण्यात आल्या. त्यात उरण तालुका महिला अध्यक्ष म्हणून निर्मला पाटील, रायगड जिल्हा महिला चिटणीस सोनाली पाटील, शांता म्हात्रे, तर रायगड जिल्हा महिला सरचिटणीस म्हणून सविता ठाकूर यांची निवड करण्यात आली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. मनीष पाटील, तसेच रायगड जिल्हा महिला अध्यक्षा रेखाताई



घरत यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या नियुक्त्या करून त्यांना पदभार सोपवण्यात आला. यावेळी जयवंत पाटील, वैभव पाटील, किरीट पाटील, संतोष म्हात्रे, मिलिंद पाटील, तुलसा पंडित, पार्वती पाटील, जयश्री पाटील आदी उपस्थित होते. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांनी नवनियुक्त महिला पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## बामणडोंगरी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** जिल्हा परिषद शाळा बामणडोंगरी येथे शिवसेनेच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रमांतर्गत माजी उपसरपंच अमर म्हात्रे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वहयांचे वाटप करण्यात आले. त्यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण आणि अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे, शिवसेना जिल्हाप्रमुख विनोद साबळे, तालुका प्रमुख रघुनाथ पाटील, जिल्हा संघटक महेंद्र पाटील, महिला प्रवक्ता विनिता बर्फे, विभाग प्रमुख संकल्प घरत, नामदेव ठाकूर तसेच अनेक शिवसैनिक उपस्थित



होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना अभ्यास करून उज्वल भविष्य घडवण्याचे आवाहन केले.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना भात, तूर बियाणे व गोकृपा अमृत विरजणाचे वाटप

### रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते वितरण; कृषी योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी विभागामार्फत यूएनडीपी (UNDP) योजनेअंतर्गत भात बियाण्यांचे वाटप, अन्न सुरक्षा अभियानांतर्गत तूर बियाण्यांचे वितरण तसेच गोकृपा अमृतचे विरजण वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा परिषद सदस्या अनन्या गाताडे, सरपंच मिनाक्षी जगताप आणि पोसरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच बंडू शिद यांच्या हस्ते संपन्न झाला.

कार्यक्रमास सेंद्रिय शेती पुरस्कार प्राप्त शेतकरी मिनेश गाडगीळ तसेच प्रगतशील शेतकरी शांताराम मालूसरे, सुजित पाटील, जगदीश म्हसकर, संतोष भोसले आणि कैलास मालूसरे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित



होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी प्रास्ताविक करून कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी योजनांची माहिती देऊन आधुनिक व शाश्वत शेतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

यावेळी अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी गुळसुंदे येथील शेतकरी प्रमोद विधवांस यांच्या शेताला भेट देऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) फळबाग लागवड तसेच भात रोपवाटिकेची पाहणी केली व त्याबाबत माहिती घेतली.

कार्यक्रमात सेंद्रिय शेती पुरस्कार प्राप्त शेतकरी मिनेश गाडगीळ आणि प्रगतशील शेतकरी सुजित पाटील



यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती, सेंद्रिय शेती आणि उत्पादनवाढीच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी जानू भिकू गोठळ यांनी आकुळवाडी गावात राबविण्यात आलेल्या बांधबंदिस्तीच्या कामांमुळे तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे गावातील भातशेती क्षेत्रात लक्षणीय वाढ झाल्याचे सांगितले. यासाठी त्यांनी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका कृषी अधिकारी भगवान हेगडे आणि सहाय्यक कृषी अधिकारी प्रसाद पाटील यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांचे आभार मानले. सहाय्यक कृषी अधिकारी प्रसाद पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. या कार्यक्रमास गुळसुंदे समूह ग्रामपंचायत परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# मदत शिक्षकांची

मी स्वतः पनवेल तालुक्याच्या ग्रामीण भागामध्ये पाच वर्ष गणित -विज्ञान शिक्षक म्हणून सेवा केलेली आहे. त्यानंतर पनवेल शहरांमध्ये नवीन पनवेल येथे एकाच शाळेत 28 वर्ष माध्यमिक विभागामध्ये गणित शिक्षक म्हणून सेवा केली व सेवेची शेवटची चार वर्ष गणित शिक्षक आणि पर्यवेक्षक म्हणून सेवा करण्याची मला संधी मिळाली. एकूण सेवा सदोतीस वर्षे झाली सध्या सेवानिवृत्त आहे.

जुलै च्या पहिल्या आठवड्यामध्ये जिल्हाधिकारी साहेब यांची दोन पत्रे वाचनात आली म्हणून हा लेख लिहावासा वाटला. त्या पत्रामधील मजकूराचा काही भाग असा आहे की,रायगड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी चालू आहे आणि हवामान खात्याच्या अंदाजानुसार अजून दोन दिवस अतिवृष्टी व जोराचा सोसाट्याचा वारा सुटणार आहे कोणत्याही विद्यार्थ्याला याची इजा पोहोचू नये म्हणून जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या सर्व शाळा व महाविद्यालयांना सुट्टी राहील. याच या पत्रामधील पुढची ओळ फार महत्त्वाची आहे बर का, त्यांनी म्हणजे साहेबांनी पुढे असे लिहिलेले आहे की, परंतु सर्व शिक्षकांनी आपापल्या शाळेत जायचं आहे आणि गरज पडल्यास स्थानिक आपत्ती व्यवस्थापनाला मदत करायची आहे.

प्रश्न असा पडतो की शिक्षकांना आपत्ती व्यवस्थापनाचे कोणतेही प्रशिक्षण कधीही दिले गेलेले नाही असे मला वाटते हा एक भाग झाला आणि दुसरा आणि अति महत्त्वाचा भाग असा आहे की,शिक्षकांना शाळेत जाताना पाऊस,नदी,नाले ओढे व सोसाट्याचा वारा नाही का? म्हणजे शिक्षकांना याची इजा झाली तरी चालेल पाण्यात वाहून गेले तरी चालतील असंच म्हणायचं का?

म्हणजे शिक्षकांच्या बाबतीत असे आहे की जिथे कमी तिथे आम्ही किंवा जिथे गरज तेथे शिक्षक. कारण सन 2021 - 22 मध्ये कोरोना जास्त प्रमाणात पसरत होता त्यावेळी लोकांनी प्रवास करू नये म्हणून नाकाबंदी केली जात होती. त्यावेळी नाकाबंदी करण्यासाठी त्यांच्या नोंदी ठेवण्यासाठी, वाहने थांबवण्यासाठी, पोलिसांना मदत करण्यासाठी शिक्षकांच्या नेमणुका केल्या गेल्या होत्या. तसेच कोणतीही निवडणूक येऊ द्या महसूल खात्याकडून निवडणुकीच्या जबाबदारीच्या कामांसाठी शिक्षकांची नेमणूक केली जाते. तसेच मतदार याद्या दुरुस्त करण्यासाठी, नवीन मतदार नोंदणी करण्यासाठी, मतदान कार्ड वाटप करण्यासाठी, घरगणना करण्यासाठी,जनगणना करण्यासाठी, गुराढोरांची कोंबड्या कुत्र्यांची संख्या मोजण्यासाठी शिक्षकांचीच नेमणूक केली जाते. पूर्वी तर मला असे आठवते की काही वर्षांपूर्वी महिलांना कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी तयार करणे हे सुद्धा काम दिलेले होते. यासाठी हॉस्पिटलमध्ये मी आणि माझी पत्नी गेलो सुद्धा होतो.

शिक्षकांची नेमणूक ही विद्यार्थ्यांना विषयाचे अध्यापन करण्यासाठी, त्यांना चांगल्या सवयी लावण्यासाठी, भविष्यातील आदर्श नागरिक बनवण्यासाठी, केलेली असते असे मला वाटते. परंतु वरील सर्व कामे अध्यापनाचा विचार नकरता शिक्षकांच्याकडून दम देऊन करून घेतली जातात. शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त सुद्धा शाळेत खूप कामे असतात याचा कधी विचार होईल की नाही असा प्रश्न जवळपास सर्व शिक्षकांना पडलेला आहे. आता ज्यांना अनुभव नाही ते लोकं असे म्हणतील की काय काम असतं शिक्षकांना?

त्याचे उत्तर आहे-- शिक्षकांना अध्यापन करणे, गृहपाठ तपासणे, हजेरी घेणे, स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करणे, उजळणी घेणे, परीक्षा घेणे, पेपर तपासणे, निकाल पत्रक बनवणे, गुणपत्रक तयार करणे, शाळेतील सर्व उपक्रम राबवणे क्रीडा स्पर्धा घेणे,प्रेरणादायी व्याख्याने ठेवणे , पालक सभा आयोजित करणे, माता पालक सभा घेणे,शासकीय व अशासकीय स्पर्धा परीक्षेला मुलांना बसवून त्याची तयारी करून घेणे,आधार कार्ड नोंदी ठेवणे,यु-डायस प्लस ला सर्वांच्या नोंदी करून घेणे, अपार आय डी बनवणे, मुख्यमंत्री सुंदर शाळा लिंक वरती सर्व माहिती भरणे, स्कॉफ ची सगळी माहिती ऑनलाईन भरणे, प्रशिक्षणाला हजर राहणे, पोषण आहाराच्या नोंदी ठेवणे, नवीन विद्यार्थ्यांच्या नोंदी करणे, जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या करणे, शाळेमध्ये अनेक घटना घडतात त्याला सामोरे जाणे, अशी अनेक कामे शिक्षकांना असतात यापेक्षा वेगळी कामे सुद्धा अनेक आहेत. शिक्षण खात्याचे अनेक उपक्रम असतात त्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे, जसे विज्ञान प्रदर्शन आहे, इन्स्पायर अवार्ड आहे,विज्ञान परिषदेच्या विज्ञान खेळणी बनवणे उपक्रम असतो, तक्ते तयार करून घेणे, वैज्ञानिक नाटक बसवणे व उपक्रमामध्ये सहभागी होणे.

तसेच एम पी एस सी, यु पी एस सी, रेल्वे, पोस्ट, वैज्ञानिक ए, वैज्ञानिक बी, TET, TAIT, NMMS अशा अनेक परीक्षा शिक्षकांना घ्याव्या लागतात. बोर्डाच्या परीक्षा घेणे. बोर्डाचे व शाळेच्या परीक्षेचे पेपर एकाच वेळेला तपासायला येत असतात ते वेळेपूर्वी तपासून गुण याद्या बनवून द्याव्या लागतात. मग मला सांगा फेब्रुवारी मार्चमध्ये अनेक कामे एकाच वेळी शिक्षकांना करावी लागतात अशा वेळी इतर खात्यातील लोकांना एखादे पत्र का निघत नाही की, शिक्षकांना मदत करण्यासाठी तुमची नेमणूक करण्यात आलेली आहे सदर काम वेळेत केले नाही तर आपल्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**लेखक - श्री जालिंदर केरू कुंभार (सेवानिवृत्त पर्यवेक्षक)**

## विटाळी येथील शेतात रानडुकरांचा हल्ला; विटाळी येथील मजुर जखमी !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी :** आकोट तालुक्यातील वरूर/विटाळी येथील रतन इंगळे यांच्या शेतशिवारात मंगळवार १५ जुलै २६ रोजी सकाळी १०:३० च्या सुमारास डवरनी करण्यासाठी गेलेल्या विटाळी येथील उल्हास महादेव इंगळे यांच्यावर रानडुकरांनी अचानक हल्ला केल्याची घटना घडली.

उल्हास इंगळे हे नेहमीप्रमाणे शेतकामासाठी वरूर येथील रतन इंगळे यांच्या शेतात डवरणी करिता गेले होते. शेतात काम सुरू असतानाच झाडीत लपून बसलेल्या रानडुकराने त्यांच्यावर झडप घातली.अचानक झालेल्या हल्ल्यामुळे घाबरून इंगळे यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत त्यांना हाताला दुखापत झाली त्यात त्यांना मोठी जखम झाली फ्रॅक्चर सुद्धा झाले.

.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी धाव घेऊन रानडुकरांना हुसकावले. त्यानंतर जखमी उल्हास इंगळे यांना तातडीने उपचारासाठी अकोट येथील सरकारी दवाखान्यांमध्ये दाखल करण्यात आले. आणि त्यांनी अकोला सरकारी दवाखाना मध्ये रेफर केले सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर



**शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण !!**
गेल्या काही दिवसांपासून या भागातील शेतांमध्ये रानडुकरांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पिकांची नासधूस होत असतानाच आता शेतात काम करणाऱ्या लोकांवरही हल्ले होऊ लागल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वनविभागाने तातडीने रानडुकरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.घटनेची माहिती मिळताच वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष चरण इंगळे हे घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी पाहणी केली. व वन विभागाला माहिती दिली पुढील तपास वनविभागाकडून सुरू आहे.

## अंभोरा गावाची पहिली महिला आर्किटेक्ट बनण्याचा मान; दिव्या खाकाळ यांचे उल्लेखनीय यश

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा, प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत विविध व्यावसायिक क्षेत्रात आपला ठसा उमटविण्याची परंपरा दिवसेंदिवस अधिक बळकट होत आहे. त्याचाच प्रत्यय अंभोरा (ता. आष्टी) येथील कु. दिव्या गोरक्षनाथ खाकाळ यांच्या यशातून आला आहे. दिव्या यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे येथून बी.आर्क. (Bachelor of Architecture) ही पदवी यशस्वीरीत्या संपादन करून अंभोरा गावातील पहिल्या महिला आर्किटेक्ट होण्याचा बहुमान मिळविला आहे. १४ जुलै २०२६ रोजी जाहीर झालेल्या निकालात त्यांनी हे यश मिळवत गावाच्या शैक्षणिक इतिहासात एक नवा मानाचा अध्याय लिहिला आहे.

आर्किटेक्चरसारख्या आव्हानात्मक आणि सर्जनशील क्षेत्रात यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, कल्पकता, तांत्रिक ज्ञान आणि मेहनतीची आवश्यकता असते. दिव्या यांनी या सर्व गुणांच्या बळावर शिक्षणाचा प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी चिकाटी, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या कुटुंबासह संपूर्ण गावाचे नाव उंचावले आहे.

लहानपणापासूनच अभ्यासात रुची असलेल्या दिव्या यांनी शालेय व महाविद्यालयीन जीवनात विविध शैक्षणिक आणि सर्जनशील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनाही मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेण्याची प्रेरणा मिळणार आहे. विशेषतः आर्किटेक्चर आणि डिझाइनसारख्या व्यावसायिक क्षेत्रात करिअर करू



इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचे यश मार्गदर्शक ठरणारे आहे.

आपल्या या यशाचे श्रेय दिव्या यांनी वडील पुणे येथील उद्योजक गोरक्षनाथ खाकाळ, आई भारती खाकाळ तसेच संपूर्ण कुटुंबीयांनी दिलेल्या प्रोत्साहनाला आणि मार्गदर्शनाला दिले आहे. पुढील काळात लक्झरी इंटेरियर डिझाइन या क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन आधुनिक, आकर्षक आणि दर्जेदार वास्तुरचना व अंतर्गत सजावटीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याची त्यांची इच्छा आहे.

दिव्या यांच्या या यशाबद्दल अंभोरा गावचे सरपंच सागर आमले, गावातील ज्येष्ठ नागरिक, सर्व ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार, स्टर्लिंग टॉवर सोसायटी, पुणे तसेच सुपर ट्रेडिंग ग्रुप यांनी त्यांचे अभिनंदन करून उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या यशामुळे अंभोरा गावाच्या शैक्षणिक प्रगतीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, गावातील विद्यार्थ्यांसाठी हे यश प्रेरणादायी ठरत आहे.

दिव्या खाकाळ यांनी मिळविलेली ही उल्लेखनीय कामगिरी केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण अंभोरा गावासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील मुलींमध्ये उच्च शिक्षणाची जिद्द आणि आत्मविश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## छोटे पंढरपूर ओळखले जाणारे देवणी येथे २२ ते २९ जुलैदरम्यान ६४ वा अखंड हरिनाम सप्ताह

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** देवणी छोटे पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या देवणी शहराचे प्राचीन कालीन ग्रामदैवत व देव नदीकाठी वसलेले श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्ष २६ वा ६४ वा अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देव नदीमध्ये भक्त पुंडलिकाचे मंदिर स्थित असून, हे स्थान लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे.

दि. २२ जुलै ते २८ जुलै या कालावधीत सप्ताहादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. दररोज सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ तुकोबाराय गाथा भजन, दुपारी ३ ते ५ रामकथा, सायंकाळी ६ ते ७ हरिकीर्तन, रात्री ८ ते १० हरिजागर तसेच रात्री १० ते १२ काकडा आरती आणि पहाटे ४ ते ६



दैनंदिन धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

**कीर्तन सेवा**

दि. २२ व २४ जुलै रोजी ह.भ.प. रमेश महाराज मेहकर, २३ जुलै रोजी ह.भ.प. गोविंदराव दोडके, २५ जुलै रोजी ह.भ.प. अशोक महाराज देशपांडे (खानापूर), २६ जुलै रोजी ह.भ.प. संतोष महाराज, २७ जुलै रोजी ह.भ.प. ब्रह्मानंद महाराज जाऊर, तर २८ जुलै रोजी ह.भ.प. मल्लिकार्जुन आप्पा महाराज हंगरगा यांची कीर्तन सेवा होणार आहे. तसेच रामकथा प्रवक्ते ह.भ.प. अभंगराव निटुरे हे दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत रामकथा सादर करणार आहेत.

**आषाढी एकादशीनिमित्त भव्य पालखी मिरवणूक**

आषाढी एकादशीनिमित्त देवणी शहरात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापासून सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. पालखी पूजनाचा मान नूतन लातूर जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. उषाताई संभाजीराव पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे.

**२९ जुलै रोजी काल्याच्या कीर्तनाने समारोप**

सप्ताहाची सांगता दि. २९ जुलै रोजी सकाळी १० ते १२ वाजता काल्याच्या कीर्तनाने होणार असून, समारोपाची कीर्तन सेवा ह.भ.प. मल्लिकार्जुन आप्पा महाराज हंगरगा यांच्या कीर्तनाने होणार आहे.

## नीट यूजी २०२६ परीक्षेत पनवेलचा सानिध्य डोंगरे मुंबईत अव्वल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (एईएसएल) च्या पनवेल शाखेतील विद्यार्थि सानिध्य डोंगरे ह्याने नीट यूजी २०२६ परीक्षेत ७२० पैकी ७०० गुण मिळवत अखिल भारतीय क्रमवारीत (एआयआर) २८ वा क्रमांक पटकावला असून मुंबई शहरात अव्वल स्थान मिळवले आहे.

"एआयआर २८ मिळवणे हे माझ्यासाठी स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे. माझ्या पालकांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि आकाशमधील शिक्षकांनी दिलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले. नियमित सराव परीक्षा,



कामगिरीचे विश्लेषण आणि शंका निरसन सत्रांमुळे माझा आत्मविश्वास वाढला. यापुढे एक यशस्वी डॉक्टर होण्यासाठी आणखी मेहनत घेण्याची प्रेरणा या यशातून मिळाली आहे," असे सानिध्य डोंगरे यांनी सांगितले. यंदा नीट यूजी २०२६ मध्ये आकाशच्या चार विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या १० मध्ये, १८ विद्यार्थ्यांनी पहिल्या ५० मध्ये, तर ४१ विद्यार्थ्यांनी पहिल्या १०० मध्ये स्थान मिळवले आहे. उप प्रादेशिक संचालक सी. एस. मिश्रा यांनी सानिध्यचे अभिनंदन करत त्याचे यश संपूर्ण आकाश परिवारासाठी अभिमानास्पद असल्याचे सांगितले. तज्ज्ञ शिक्षक, दर्जेदार अभ्यास साहित्य, कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित कामगिरी विश्लेषण, नियमित मूल्यमापन आणि वैयक्तिक मार्गदर्शन यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम बनवण्याची आकाशची परंपरा कायम असल्याचे संस्थेने नमूद केले.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराजांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

### प्रेममूर्ती धर्मराज दादा सामनगावकर यांचे ज्ञानप्रबोधनपर कीर्तन; भाविकांकडून स्कॉर्पिओ वाहन भेट

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** श्रीक्षेत्र ईश्वरबाबा भारती बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त संस्थान परिसरात भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी गुरुपीठ सामनगावचे ह.भ.प. प्रेममूर्ती धर्मराज दादा सामनगावकर यांचे सुश्राव्य, ज्ञानप्रबोधनपर व भक्तिरसाने ओतप्रोत कीर्तन संपन्न झाले. या सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक, वारकरी, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. महंत शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज यांनी वारकरी संप्रदायाची परंपरा जपत नामस्मरण, कीर्तन, प्रवचन, समाजप्रबोधन



तसेच धर्म-संस्कृतीच्या जतनासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानच्या माध्यमातून विविध धार्मिक, सामाजिक आणि आध्यात्मिक उपक्रम राबविले जात असून हजारो भाविकांना अध्यात्माची प्रेरणा मिळत आहे. अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त पूजन, आरती, हरिनाम संकीर्तन, भजन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. उपस्थित भाविकांनी पुष्पहार, शाल-श्रीफळ अर्पण करून महाराजांचा सत्कार करत त्यांना दीर्घायुष्य व निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

**वारकरी परंपरेचे जतन करणारे संतस्वभावी व्यक्तिमत्त्व**

महंत शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज यांनी वारकरी संप्रदायाची शिकवण ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य केले आहे. अध्यात्मासोबतच सदाचार, व्यसनमुक्ती, मानवता, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश त्यांनी सातत्याने दिला आहे. त्यांच्या कार्यामुळे श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान पंचक्रोशीत श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचे प्रेरणास्थान म्हणून ओळखले जाते.

**अभिष्टचिंतनानिमित्त भाविकांकडून स्कॉर्पिओ वाहन भेट...**

अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भाविकांनी महंत शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज यांना नवीन स्कॉर्पिओ वाहन भेट देऊन अनोख्या पद्धतीने कृतज्ञता व्यक्त केली. गुरुपीठ सामनगावचे ह.भ.प.प्रेममूर्ती धर्मराज दादा सामनगावकर यांच्या शुभहस्ते वाहनाच्या चाव्या महाराजांकडे सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि जयघोषात आनंदोत्सव साजरा केला. त्यानंतर महाराजांच्या हस्ते सर्वांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि विश्वकल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. उपस्थितांनी महाराजांना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांची धर्मसेवा व समाजप्रबोधनाचे कार्य असेच अखंड सुरू राहो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

## मतदार यादी पुनरीक्षणाला मुदतवाढ

**मुंबई :** राज्यातील अतिवृष्टीमुळे मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) मोहिमेच्या कामात अडथळे निर्माण झाल्याने भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी मुदतवाढीची केलेली विनंती आयोगाने मान्य केली आहे. नव्या कार्यक्रमानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मतदारांच्या गृहभेटी घेऊन पडताळणी करतील. याच काळात मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व आवश्यक पुनर्रचनेचे कामही पूर्ण केले जाईल. या मोहिमेचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त ठेवणे, पात्र नागरिकांची नावे समाविष्ट करणे तसेच अपात्र नोंदी वगळणे हा आहे. सुधारित वेळापत्रकानुसार १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होईल. त्यानंतर १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे आणि हरकती स्वीकारल्या जातील. तसेच १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबरदरम्यान संबंधितांना नोटिसा देणे, सुनावणी घेणे आणि प्राप्त दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. सर्व अर्ज व हरकतींची छाननी झाल्यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते अमरावती ग्रामीण पोलिसांना पोर्टेबल टॉयलेट व रेनकोटचे लोकार्पण; आधुनिक पोलीस व्यायामशाळेचे उद्‌घाटन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : अमरावती जिल्हा नियोजन भवन येथे अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून मंजूर करण्यात आलेल्या पोर्टेबल टॉयलेट व रेनकोटचे लोकार्पण तसेच जिल्हा क्रीडा निधीतून नूतनीकरण करण्यात आलेल्या आधुनिक पोलीस व्यायामशाळेचे उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले.

यावेळी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत निवड झालेल्या युवकांना रुजू आदेशांचे वितरण करण्यात आले. या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या राज्य शासनाच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळणार असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमात आशिया कप धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून एशियन गेम्ससाठी निवड झालेल्या अमरावतीच्या कु. कुमकुम मोहोड हिचा विशेष सत्कार करण्यात आला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तिच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत आगामी एशियन गेम्ससाठी शुभेच्छा देत राज्य व देशाचे नाव उज्ज्वल करण्याचा विश्वास व्यक्त केला.




कार्यक्रमात पोलीस दलाच्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उपलब्ध करून देण्यात आलेल्या पोर्टेबल टॉयलेट आणि रेनकोटमुळे पावसाळ्यात तसेच विविध बंदोबस्ताच्या ठिकाणी कार्यरत पोलिसांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यात आलेली पोलीस व्यायामशाळा पोलिसांच्या शारीरिक तंदुरुस्तीला चालना देणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी खासदार बळवंत वानखडे, खासदार अमर काळे, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, आमदार प्रवीण पोटे-पाटील, आमदार बच्चू कडू, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रवीण तायडे, आमदार चंदू यावलकर, आमदार गजानन लवटे, आमदार केवलराम काळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त राकेश ओला, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, मनपा आयुक्त मंगेश गोंदवले, पोलीस अधीक्षक निकेतन कदम तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमातून पोलीस दलाच्या मूलभूत सुविधा, युवकांना रोजगाराच्या संधी आणि क्रीडा क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव अशा विविध उपक्रमांना चालना देण्यात आली. शासनाच्या विकासाभिमुख धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकाभिमुख प्रशासनाचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# श्री छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये ११ वीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत!

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे** : खालापूर तालुक्यातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालय श्री छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, वावोशी येथे इयत्ता अकरावीच्या नवप्रविष्ट विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. शालेय जीवनातून कॉलेज जीवनात पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या पूजनाने झाली. याप्रसंगी कॉलेजचे इंचार्ज श्री. शेळके पी बी सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या भाषणात नवीन विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात मनःपूर्वक स्वागत केले. तसेच कला व वाणिज्य शाखेतील विविध संधींवर प्रकाश टाकत, विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या नियमांचे व शिस्तीचे पालन करून



आपले भविष्य कसे उज्ज्वल करावे, याचे मोलाचे मार्गदर्शन केले.कॉलेजमधील पहिल्या दिवसाचा अनुभव आणि आपल्या पुढील प्रवासाचे ध्येय सांगताना अकरावीतील व बारावी मधील विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यामध्ये जानवी मोरे, प्रशांत मोरे आणि प्राची कुंभार, अंकिता गंगोत्रे या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर व प्रभावी भाषणे केली. कॉलेजचे समृद्ध वातावरण आणि शिक्षकांचे लाभलेले मार्गदर्शन यामुळे आपण यशाचे शिखर नक्कीच गाठू, असा विश्वास या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य आर. डी. गावित सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या."फक्त पदवी मिळवणे हे शिक्षणाचे ध्येय नसून, एक चांगला माणूस बनणे आणि समाजासाठी योगदान देणे महत्त्वाचे आहे. कला आणि वाणिज्य या दोन्ही शाखांमध्ये यशाच्या अनंत वाटा आहेत, फक्त विद्यार्थ्यांनी जिद्द आणि चिकाटी ठेवून अभ्यास केला पाहिजे," असे प्रतिपादन प्राचार्य गावित यांनी केले.

या स्वागत समारंभाला ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि अकरावीचे व बारावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व नवीन विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून येत होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुष्का देशमुख या विद्यार्थिनीने केले. भावना खरात या विद्यार्थिनीने आभार मानले.

# श्रीवर्धनमध्ये मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर; नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : श्रीवर्धन शहरासह परिसरात मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, सार्वजनिक ठिकाणे तसेच निवासी भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचे कळप मुक्तपणे फिरताना दिसत असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी पायी जाणाऱ्या नागरिकांच्या तसेच दुचाकीस्वारांच्या मागे कुत्र्यांचे टोळके लागण्याच्या घटना वाढल्या आहेत. अचानक रस्त्यावर येणाऱ्या कुत्र्यांमुळे वाहनचालकांचे नियंत्रण सुटण्याचा धोका निर्माण होत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्येही या परिस्थितीमुळे भीतीचे



वातावरण आहे.

नागरिकांच्या मते, शहरातील काही भागांत कचऱ्यामुळे आणि उघड्यावर अन्नाचा कचरा टाकला जाणे हे मोकाट कुत्र्यांची संख्या वाढण्यामागील प्रमुख कारणांपैकी एक आहे. त्यामुळे कचरा व्यवस्थापन सुधारण्याबरोबरच मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

श्रीवर्धन हे महत्त्वाचे पर्यटनस्थळ असल्याने येथे दरवर्षी हजारो पर्यटक भेट देतात. अशा परिस्थितीत शहरात मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही चिंतेचा विषय ठरत आहे. भविष्यात मोकाट कुत्र्यांमुळे एखादा गंभीर अपघात किंवा अन्य दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नगरपालिकेने मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण, नियमित लसीकरण, तसेच त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. कोणतीही अप्रिय घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा श्रीवर्धनकर व्यक्त करत आहेत.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीला प्रारंभ;

## अबू धाबीसाठी पहिले निर्यात मालाचे उड्डाण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सेवेला सुरुवात केली आहे. विमानतळावरून अबू धाबीसाठी पहिल्या आंतरराष्ट्रीय निर्यात मालाच्या खेपेला यशस्वीरित्या रवाना करण्यात आले.

या उद्घाटनपर खेपेमध्ये १,७८९ किलो वजनाचा पेरिशेबल माल होता. हा माल एअर इंडिया एक्स्प्रेसच्या IX207 या विमानाद्वारे प्रवासी विमानाच्या बेली-होल्ड कार्गो सुविधेचा वापर करून अबू धाबीकडे पाठविण्यात आला. यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीची अधिकृत नोंद झाली आहे.

अलीकडेच प्रतिष्ठित प्रिक्स व्हर्साय (Prix Versailles) या वास्तुकला व डिझाइन पुरस्कारांत २०२६ मधील जगातील सर्वात सुंदर विमानतळांपैकी एक म्हणून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची निवड करण्यात आली होती. त्यानंतरचा हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

सध्या एअर इंडिया एक्स्प्रेसकडून नवी मुंबई–अबू धाबी ही सेवा आठवड्यातून दोन वेळा, बुधवार आणि शुक्रवार, चालविण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्र तसेच पश्चिम भारतातील



निर्यातदारांना नाशवंत कृषी उत्पादने आणि वेळेवर पोहोचविणे आवश्यक असलेल्या इतर वस्तूंच्या निर्यातीसाठी संयुक्त अरब अमिराती पर्यंत आणखी एक प्रभावी हवाई मार्ग उपलब्ध झाला आहे.

ही खेप नवी मुंबई विमानतळाच्या अत्याधुनिक कार्गो सुविधांद्वारे अखंड कोल्ड चेन व्यवस्थेअंतर्गत हाताळण्यात आली. ताजी कृषी उत्पादने रेफ्रिजरेटेड वाहनांद्वारे विमानतळावर आणण्यात आली. त्यानंतर ती तापमान-नियंत्रित गोदामांमध्ये साठवून निर्धारित प्रक्रियेनुसार निर्यातीसाठी तयार करण्यात आली आणि विमानात चढविण्यात आली.

आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सेवेला झालेली ही सुरुवात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा असून, पश्चिम भारतातील आंतरराष्ट्रीय व्यापार, निर्यात आणि हवाई मालवाहतुकीला अधिक चालना मिळणार आहे.

# कातळपाडा ते चिरनेर हायस्कूल रस्त्याची पहिल्याच पावसात दुरावस्था!

## नागरिकांसह,गणेशभक्तांची रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : चिरनेर हायस्कूल ते कातळपाडा या चिरनेर गावातील प्रवाशांच्या मुख्य अंतर्गत रहदारीच्या महत्त्वपूर्ण मार्गावर मुळपाड्यात जाण्याच्या श्री महागणपती प्रवेशद्वारची स्वागत कमान ते हजरत खलिल शहा बाबा मशीदीपर्यंतच्या रस्त्याची जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाच्या पूरपरिस्थितीमुळे अत्यंत दुरावस्था झाली असून, हा रस्ता उखडून संपूर्ण खडी वर आली आहे. तसेच रस्त्याच्या एका बाजूची साईड पट्टी देखील वाहून गेली आहे. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालक व पादचाऱ्यांना मोठ्या कसरतीचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यात खड्डे व रस्त्याची खडी वर आल्याने वाहन चालकांची डोकेदुखी वाढली असून, या मार्गावर अपघात होण्याची भीती वर्तवली जात आहे.



> हा रस्ता गणेशभक्त व नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, हा रस्ता काही ठिकाणी अरुंद आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. अशा ठिकाणचे वॉल कंपाऊंड थोडे सरकविण्यासाठी संबंधित मालकांना विश्वासात घेऊन रस्त्याची अडचण त्यांना समजावली जाणार आहे. जेणेकरून या रस्त्याचे कायमचे रुंदीकरण करता येईल.
>
> भास्कर मोकल (सरपंच चिरनेर)


या रस्त्यावर अंदाजे 15 ते 20 फूट उंचीचा पुल असून पुलाचे लोखंडी रेलिंग कोसळून तुटून पडले आहेत. तर या पुलालगतचा काही भाग खचला असल्यामुळे पुलावरचा प्रवास धोकादायक व असुरक्षित झाला आहे. त्यामुळे वाहन चालकांना असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. या पुलावरील अपघाताचा धोका लक्षात घेता या पुलावर तातडीने संरक्षण कठडे बसविण्यात यावेत. अशी मागणी येथील नागरिकांमधून जोर धरत आहे. गेल्या कित्येक वर्षात या रस्त्याची ठोस अशी दुरुस्ती करण्यात आली नसल्यामुळे हा रस्ता चिरनेर हायस्कूल पर्यंत कित्येक वर्षापासून नादुरुस्त झालेला आहे.

दरम्यान या रस्त्यावरून गणेश भक्तांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. हा रस्ता परगावातील गणेश भक्त, शाळा कॉलेजचे विद्यार्थी, कामगार वर्ग, शेतकरी आणि सामान्य नागरिकांसह गुराढोरांसाठी महत्त्वपूर्ण असून, त्याची आधीच दुरुस्ती झाली असती तर या जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसात अशी दुरावस्था झाली नसती अशा प्रतिक्रिया येथील नागरिकांच्या व गणेश भक्तांच्या चर्चेमधून ऐकावास मिळत आहेत. दरम्यान या नादुरुस्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. अशी मागणी येथील नागरिक आणि गणेश भक्तांमधून केली जात असून, या रस्त्याच्या गंभीर प्रश्नाकडे संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देणार का? असा सवाल येथील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

# गोंदिया शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक राष्ट्रवादी काँग्रेस भवन, रेलटोली कार्यालय, येथे खासदार श्री राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : आदरणीय स्व.अजितदादा म्हणजे अथक परिश्रम, शब्दाला पाळणारे, समाजसेवेचा व लोकोपयोगी कामांचा ध्यास घेऊन कार्य करणारे लोकनेते होते. त्यांच्या जयंती निमित्त २२ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत विविध जनसेवेचे कार्यक्रम राबवून दादांना अभिवादन करायचे आहे. त्यासाठी गोंदिया शहरातील पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जबाबदारी देऊन कार्यक्रम यशस्वी करायचे आहे असे मार्गदर्शन खासदार श्री राजेंद्र जैन यांनी केले. पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस



पक्ष हा तळागाळातील लोकांचा पक्ष असून गोंदिया शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन प्रत्येक प्रभागात वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे.

सर्वश्री राजेन्द्र जैन, देवेन्द्रनाथ चौबे, शहर अध्यक्ष नानू मुदलियार, माधुरी नासरे, केतन तुरकर, अशोक सहारे, टी एम पटले, खालिद खान, राज शुक्ला, अनुज जैस्वाल, कल्लू यादव, सोनू राय, कुन्दा दोनोडे, वर्षा बैस, खुशबू शिवलानी, रुचिता चौहान, संगीता येवले, विशाखा टेम्भूरने, ज्योस्तना सहारे, विष्णु शर्मा, मनोज जोशी, बंटी डोंगरे, हरिराम आसवानी, लखन बहेलिया, राहुल अग्रवाल, दिलप्रीत होरा, विनायक गजघाट, आनंद अग्रवाल, अमित भालेराव, सुनील पटले, पंकज मिश्रा, सचिन अवस्थी, बिट्टू सोनपुरे, तुषार ऊके, नितिन बोपचे, आशीष ठाकरे, विक्रम बहेलिया, राहुल अग्रवाल, हर्ष मेश्राम, इमरान भाई, पाशा शेख, दुलीचंद मेश्राम, दिनेश गेडाम, मयूर येवले, श्रीकांत, योगेश दरवे, लव माटे, कपिल बावनथड़े, कुणाल बावनथड़े, चिराग बावनथड़े सहित शहरातील पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# मनसेकडून सिद्धेश पावले यांची शहराध्यक्षपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रायगड जिल्ह्यातील उत्तर रायगड क्षेत्रातील करंजाडे नोड शहराध्यक्षपदी सिद्धेश पावले यांची नियुक्ती केली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र देण्यात आले असून, पक्ष संघटन मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.नियुक्तीपत्रात मनसेची ध्येय-धोरणे आणि पक्षाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच पक्ष संघटनेत शिस्त राखणे, कोणत्याही प्रकारची कुरापत किंवा तडजोड न करणे आणि समाजात पक्षाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी कार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.ही नियुक्ती प्रारंभी एका वर्षासाठी करण्यात आली असून, संबंधित पदाचा कार्यअहवाल व कामगिरीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात



येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. सिद्धेश पावले यांच्या नियुक्तीमुळे करंजाडे व उत्तर रायगड परिसरातील मनसेच्या संघटनात्मक कामाला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा पक्ष कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, नियुक्तीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून आगामी काळात पक्षविस्तारासाठी ते सक्रियपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# खरंच व्यावसायिक शिक्षक संघटनांचे अस्तित्व शिल्लक आहे का ?

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या - २०२६ च्या विधान परिषदेचे निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. इच्छुक उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे, बैठका, मेळावे आणि संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर एक मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आज शिक्षकांच्या व्यावसायिक संघटना खरोखरच आपल्या मूळ उद्देशासाठी कार्यरत आहेत का?, की त्या केवळ निवडणुकीचे व्यासपीठ बनल्या आहेत?

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(क) अंतर्गत प्रत्येक भारतीय नागरिकाला संघटना, संघ, संस्था किंवा सहकारी संस्था स्थापन करण्याचा तसेच त्यामध्ये सहभागी होण्याचा मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला आहे. हा अधिकार नागरिकांना समान विचारांच्या व्यक्तींना एकत्र आणून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय किंवा व्यावसायिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संघटित होण्याचे घटनात्मक स्वातंत्र्य प्रदान करतो.

या घटनात्मक अधिकाराच्या आधारे देशभरात विविध क्षेत्रांतील नागरिकांनी आपल्या हक्कांचे संरक्षण, व्यावसायिक प्रगती, सामाजिक न्याय आणि सामूहिक हितसंबंधांच्या जपणुकीसाठी विविध संघटना स्थापन केल्या. कामगार, शेतकरी, कर्मचारी, व्यापारी, उद्योजक आणि व्यावसायिक यांच्याप्रमाणेच शिक्षकांनी,शिक्षण संस्था चालकांनी ही आपल्या सेवा-सुरक्षा, हक्क, प्रतिष्ठा आणि व्यावसायिक हितसंबंधांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र संघटनांची उभारणी केली.

उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण क्षेत्रातील विविध स्तरांवरील शिक्षकांच्या, संस्थांनाच्या समस्या शासनापुढे प्रभावीपणे मांडणे, सेवा विषयक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, शैक्षणिक गुणवत्तेला चालना देणे तसेच शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटितपणे लढा देणे, हे या संघटनांचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे. वरिष्ठ महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये, फार्मसी, अभियांत्रिकी, कृषी, आयटीआय, एमसीव्हीसी आणि इतर व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना, संस्थांना एका समान व्यासपीठावर आणून त्यांच्या सामूहिक हिताचे संरक्षण करणे, ही या संघटनांची मूलभूत भूमिका आहे.

विदर्भात या परंपरेचा उल्लेख झाला की नागपूर विद्यापीठ टीचर्स असोसिएशन NUTA (नुटा) आणि दिवंगत प्रा. बी. टी. देशमुख यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने शिक्षकांच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष केला आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिसरात दीर्घकाळ प्रभावी संघटनात्मक अस्तित्व निर्माण केले. त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी विजुक्टा , तसेच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांसारख्या संघटनांनीही आपल्या काळात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

मात्र काळ बदलला आणि त्याबरोबर संघटनांचे स्वरूपही बदलत गेले. विशेषतः २००८ नंतर विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातील अंतर्गत मतभेद, गटबाजी आणि विभाजनामुळे संघटनेची ताकद कमी होत गेली. एकेकाळी हजारो शिक्षकांना एकत्र आणणारी संघटना अनेक तुकड्यांत विभागली गेली. प्रत्येक गटाने स्वतंत्र नेतृत्व उभे केले; पण शिक्षक मात्र विखुरले गेले.

याचा परिणाम शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकांवरही झाला. २०१४ मध्ये शिक्षक नसलेल्या व्यक्तीचा विजय झाला आणि काहीचा निसटता पराभव झाला. २०२० मध्येही शिक्षक सेवेत नसलेल्या उमेदवाराने विजय मिळवला. आज २०२६ च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक इच्छुक मैदानात आहेत. काही निवृत्त शिक्षक आहेत, काही सहकारी बँकांशी संबंधित आहेत, काही व्यवसायात आहेत, तर काही इतर क्षेत्रात सक्रिय आहेत. प्रश्न त्यांच्या वैयक्तिक पात्रतेचा नाही; प्रश्न एवढाच आहे की शिक्षक मतदारसंघाचे नेतृत्व शिक्षकांच्या व्यावसायिक संघटनांकडे राहिले आहे का? या शिक्षण क्षेत्रात शासनाने सतत नियम व कायदे निर्माण करून सर्व क्षेत्राला वेठीस धरले आहे, मराठी शाळाबंद पाडून हे क्षेत्र उद्योजकांच्या घशात घालण्याचे भयंकर षडयंत्र रचल्या जात आहे! असे असतांना, आज अनेक ठिकाणी संघटना म्हणजे शिक्षकांच्या, संस्थांच्या प्रश्नांसाठी लढणारी चळवळ नसून, आमदारकीसाठी उभारलेले राजकीय व्यासपीठ अशी प्रतिमा निर्माण होताना दिसते. निवडणूक आली की, नवीन संघटना स्थापन होतात, नवीन नेतृत्व पुढे येते आणि निवडणूक संपली की त्या संघटनांची सक्रियता कमी होते. ही परिस्थिती व्यावसायिक संघटनांच्या मूळ उद्दिष्टांपासून दूर नेणारी आहे.

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे आज शिक्षक संघटनांपेक्षा संघटनांतील नेतृत्वाचे परस्पर संघर्ष अधिक चर्चेत असतात. विचारांचा संघर्ष मागे पडला असून व्यक्तींचा संघर्ष पुढे आला आहे. परिणामी शिक्षकांचे प्रश्न, शिक्षण धोरण, सेवा अटी, गुणवत्तापूर्ण शिक्षण, नव्या शैक्षणिक आव्हानांवरील भूमिका या विषयांपेक्षा निवडणुकीतील समीकरणे अधिक महत्त्वाची ठरू लागली आहेत.परिणामता शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची बेबंदशाही, लाचखोरी वाढून त्यांच्या द्वारे शिक्षक आणि संस्था चालकांचे शोषण होत आहे!

सध्या विदर्भातील माध्यमिक शिक्षकांच्या अनेक संघटना अस्तित्वात आहेत. प्रत्येक संघटनेला स्वतःची ताकद असल्याचा विश्वास आहे; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, संघटनांची संख्या वाढली, पण शिक्षकांची एकजूट कमी झाली. मतदार तेवढेच; मात्र संघटना अनेक. अशा परिस्थितीत प्रत्येक संघटना दुसऱ्याचा मार्ग अडविण्यात ऊर्जा खर्च करत असेल, तर शिक्षकांच्या सामूहिक हिताचे प्रतिनिधित्व कोण करणार?

यामुळेच शिक्षक मतदारसंघात शिक्षक संघटनांशी थेट संबंध नसलेले किंवा सक्रिय अध्यापनापासून दूर गेलेले उमेदवारही यशस्वी होताना दिसतात. जेव्हा व्यावसायिक संघटना स्वतःची विश्वासार्हता आणि एकसंघता गमावतात, तेव्हा निर्माण झालेली पोकळी इतरजण भरून काढतात. हा लोकशाहीचा दोष नाही; तो संघटनात्मक कमकुवतपणाचा परिणाम आहे.

आज गरज आहे ती आत्मपरीक्षणाची. शिक्षक संघटना केवळ निवडणुका लढविण्यासाठी आहेत की शिक्षकांच्या व्यावसायिक हक्कांसाठी, या क्षेत्रातील शिक्षण संस्था,त्यांचे अधिकार, सर्व मराठी शाळा संपून बहुजणांचे हिरावून घेणारी व्यवस्था या सर्व अन्यायाला ठाम पणे विरोध करणारी, कायदेशीर अभ्यास असणारी व्यक्ती, या विचाराची जाणीव असणारी व्यक्ती असावी कि फक्त त्या नेतृत्वाचा उद्देश आमदारकी मिळविणे हा असावा?

अमरावती शिक्षक मतदारसंघाची-२०२६ ची निवडणूक केवळ आमदार निवडण्याची प्रक्रिया नाही; ती शिक्षकांच्या व्यावसायिक संघटनांच्या विश्वासार्हतेचीही परीक्षा आहे. या निवडणुकीत मतदारांनी उमेदवाराइतकाच संघटनांच्या कार्याचा, त्यांच्या सातत्याचा आणि शिक्षकांप्रती असलेल्या बांधिलकीचाही विचार करणे आवश्यक आहे.

कारण शेवटी प्रश्न केवळ "कोण आमदार होणार?" हा नाही; तर "शिक्षकांच्या व्यावसायिक संघटनांचे अस्तित्व, शाळांचे जिवंत असणे, त्या टिकणे, बहुजणांचे हक्काचे शिक्षण अबाधित राहणे हा उद्देश, आणि उद्दिष्टे पुढील पिढीसाठी जिवंत ठेवणे! हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे !



**डॉ. मेघश्याम करडे,**
**अमरावती**
**94041 03539**

# जासई विद्यालयाला ONGC कडून मिळाली "आठ इंटरॅक्टिव्ह पॅनल" ची भरभरून भेट

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर :** श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई विद्यालयात ONGC कंपनीच्या CSR फंडातून जनजागृती व समाज प्रबोधन सेवा समिती यांच्या सहाय्याने आठ इंटरॅक्टिव्ह पॅनल बसविण्यात आले या कार्यक्रम प्रसंगी ओ. एन . जी . सी चे एस.एन. शर्मा प्लांट मॅनेजर उरण ,भावना आठवले जीएम हेड एच आर , अनिल कांबळे मॅनेजर एच आर ,प्रज्ञान शर्मा चीफ एंजिनियर तसेच जन जागृती व समाज प्रबोधन कार्य समिती चे अध्यक्ष - श्री राकेश गायकवाड

सेक्रेटरी - श्री. बी.जी गायकवाड

प्रमुख सल्लगार - श्री उमेश नांदोसकर

सद्यस्य -सुनील तांबे

सद्यस्य - राजेश गायकवाड. शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष तसेच कामगार नेते सुरेश पाटील साहेब ,स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य नरेश शेट घरतउपस्थित होते . लेझीम व ढोल ताशाच्या तालावर पाहुण्यांचे स्वागत



करण्यात आले .प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले .प्रतिमापूजन आणि दीप प्रज्वलन करून विद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली . उपस्थित सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी सान्वी घरत आणि आरती

गलंडे या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतात. Interactive Panel मुळे आपल्याला अभ्यासात त्याची किती मदत. होईल हे सांगून. उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले .एस.एन. शर्मा प्लांट मॅनेजर उरण ,भावना आठवले मॅडम , सुरेशपाटील साहेब बी . जी गायकवाड यांनी आपले मनोगत मांडले . प्रायोगिक तत्वावर दहावी क च्या वर्गातील interactive panel चे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयास ही मदत मिळवून देण्यात विद्यालयाचे हरहुन्नरी कला शिक्षक श्री जोशी सर यांचा सिंहाचा वाटा असल्याने त्यांचेही पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री गाताडी सर यांनी केले. आलेल्या सर्व उपस्थितांचे आभार प्रदर्शन करताना, विद्यालयासाठी ONGC कडून देण्यात येणारी सोलर पॅनलची भेट त्यांनी लवकरात लवकर द्यावी, अशी विनंती श्री गाताडी सरांनी केली.

या कार्यक्रमप्रसंगी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री कुटे सर, पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम, विद्यालयातील सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अश्या आनंदी वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला .

# बाबुराव तिडके यांनी इतरांच्या जीवनात आनंद पेरला – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

## बाबुरावजी तिडके श्रद्धांजली सभा

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : उमद्या व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या बाबुराव तिडके यांनी नेहमीच जनसामान्यांचा विचार केला. इतरांच्या जीवनात आनंद पेरण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांची संख्या मोठी आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबुराव तिडके यांना आदरांजली वाहिली. ज्येष्ठ काँग्रेस नेते बाबुराव तिडके यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चिटणवीस सेंटर येथे सर्वपक्षीय सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.



आपल्या वडिलांशी तिडके यांची घनिष्ठ मैत्री होती असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, पक्षाच्या पलिकडे मैत्री जपण्याचा त्यांचा स्वभाव होता. सहकाराच्या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय काम केले. आपला साखर कारखाना अडचणीत आला त्यावेळी तो वाचावा, कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत देता यावे यासाठी गृहलक्ष्मीचे दागिने त्यांनी तारण ठेवले, इतकी कळकळ त्यांच्यात होती, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, तिडके हजरजबाबी होते. भूविकास बँकेचे अध्यक्ष म्हणून काम करताना शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी सोडविल्या. संबंधांमध्ये त्यांनी कधी पक्ष येऊ दिला नाही.

सहकार, शिक्षण, सामाजिक अशा क्षेत्रातील ते मार्गदर्शक होते, असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी बोलताना म्हणाले. समाजाप्रती कळकळ असलेल्या या नेत्याचा जीवन प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे पालकमंत्री. श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

# 'पनवेल महानगरपालिकेने विविध प्रभागात बांधलेल्या आकांक्षी दर्जाच्या शौचालयांचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेमार्फत विविध प्रभागात बांधण्यात आलेल्या आकांक्षी दर्जाच्या शौचालयांचे लोकार्पण शुक्रवारी (१७ जुलै) करण्यात आले. त्यापैकी खांदेश्वर पार्किंग, खांदा कॉलनी तसेच खांदेश्वर गार्डन, खांदा कॉलनी या ठिकाणच्या शौचालयांचे लोकार्पण पनवेल विधानसभेचे सन्माननीय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या लोकार्पण सोहळ्याकरीता पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, तसेच महापालिका नगरसेवक एकनाथ गायकवाड, नगरसेविका कुसुम गणेश पाटील, नगरसेविका सिताताई पाटील, नगरसेवक दशरथ म्हात्रे उपस्थित होते.

तसेच कळंबोली मधील मिरची हॉटेल शेजारी बांधण्यात आलेल्या आकांक्षी दर्जाच्या शौचालयांचे लोकार्पण उप महापौर प्रमिलाताई पाटील यांच्या शुभ हस्ते लोकार्पण करण्यात आले. सदर लोकार्पण सोहळ्याकरीता महापालिका नगरसेविका दमयंती भोईर, नगरसेविका मनाली ठाकूर, नगरसेविका सरस्वती काथारा, नगरसेविका मोनिका महानवर, नगरसेवक शशीकांत शेळके, नगरसेविका दमयंती भोईर तसेच समाजसेवक रविशेठ पाटील उपस्थित होते.

कामोठे मध्ये मानसरोवर रेल्वे स्टेशन पार्किंग या ठिकाणी बांधण्यात आलेल्या आकांक्षी दर्जाच्या शौचालयांचे लोकार्पण पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक विकास घरत यांच्या शुभ हस्ते लोकार्पण करण्यात आले.या लोकार्पण सोहळ्याकरीता महापालिका नगरसेवक रविंद्र जोशी, नगरसेवक डॉ. अरुण भगत, नगरसेविका



हेमलता रवी गोवारी, नगरसेविका शीला भगत तसेच सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रुपाली माने उपस्थित होते.

नवीन पनवेल मधील शहीद तुषार चव्हाण गार्डन या ठिकाणी बांधण्यात आलेल्या आकांक्षी दर्जाच्या शौचालयांचे लोकार्पण




पनवेल महानगरपालिकेच्या सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांच्या शुभ हस्ते लोकार्पण करण्यात आले. सदर लोकार्पण सोहळ्याकरीता महापालिका नगरसेवक मनोज कृष्णाजी भुजबळ, नगरसेवक समिर ठाकूर, नगरसेविका राजेश्री वावेकर उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेने शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून या उपक्रमामुळे नागरिकांच्या दैनंदिन सुविधांमध्ये मोठी भर पडणार आहे.

**आकांक्षी स्वच्छतागृह**

आकांक्षी स्वच्छतागृह ही आधुनिक, स्वच्छ, सुरक्षित, दिव्यांग-अनुकूल आणि नागरिक-केंद्रित सार्वजनिक स्वच्छतागृहांची संकल्पना आहे. या स्वच्छतागृहांमध्ये केवळ मूलभूत सुविधा नसून उच्च दर्जाच्या स्वच्छता, तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक सुविधांचा समावेश केला जातो.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना कायमस्वरूपी जागा द्या; अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( प्रतिनिधी ) :** मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना उत्सवाबरोबरच वर्षभर राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. महासंघाच्या निवेदनानुसार, मुंबईत सुमारे १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे कार्यरत असून ती केवळ गणेशोत्सवापुरती मर्यादित नसून वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवितात. अनेक मंडळांकडून बालवाड्या, व्यायामशाळा, रक्तपेढी, मेडिकल सेंटर, फिजिओथेरपी केंद्र, वाचनालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम तसेच ॲम्ब्युलन्स सेवा अशा लोकाभिमुख सेवा कमी दरात उपलब्ध करून दिल्या जातात. निवेदनात म्हटले आहे की, मुंबईत सुरू असलेल्या पुनर्विकास प्रकल्पांमुळे विशेषतः म्हाडा वसाहतींमधील अनेक मंडळांच्या जागा धोक्यात आल्या आहेत. विकासकांकडून जागा खाली करण्यासाठी दबाव आणला जात असल्याने भविष्यात गणेशोत्सव साजरा करणे आणि वर्षभराचे सामाजिक उपक्रम राबविणे कठीण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे लोकप्रतिनिधी निधीतून उभारण्यात आलेले सभागृह, मंडप किंवा शेड संबंधित मंडळांच्या नावावर करून द्यावेत अथवा पुनर्विकासाच्या ठिकाणी मंडळांना योग्य मोबदल्यात कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी महासंघाची प्रमुख मागणी आहे. त्यामुळे भविष्यातही गणेशोत्सवाची परंपरा आणि मंडळांचे सामाजिक कार्य अखंडित सुरू राहील, असे महासंघाने नमूद केले आहे. हे निवेदन महासंघाचे प्रमुख कार्यवाह सुरेश सरनोबत, कार्याध्यक्ष सुहास अडिवरेकर आणि अध्यक्ष जयेंद्र साळगावकर यांच्या स्वाक्षरीने मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# मी पोलीस आहे' म्हणत भरदिवसा सोन्याच्या अंगठ्या लंपास!

# वाशिम जिल्ह्यात बनावट पोलीस टोळीचा धुमाकूळ; रिसोड–मालेगाव हादरले!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यात नागरिकांना लक्ष्य करत स्वतःला पोलीस अधिकारी म्हणून ओळख देणारी बनावट टोळी सक्रिय झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. भरदिवसा सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना गाठून, "शहरात दंगल सुरू आहे", "सोन्याचे दागिने घालून फिरणे धोकादायक आहे", "अंगठी काढून खिशात ठेवा किंवा माझ्याकडे द्या," असे सांगून विश्वास संपादन करत क्षणार्धात सोन्याच्या अंगठ्या लंपास करण्याचे प्रकार घडत आहेत. रिसोड तालुक्यातील महागाव आणि मालेगाव तालुक्यातील धार पिंप्री येथे एकाच पद्धतीने घडलेल्या दोन घटनांमुळे संपूर्ण वाशिम जिल्ह्यात खळबळ उडाली असून, ४ ते ५ जणांची बनावट पोलीस टोळी जिल्ह्यात सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पहिल्या घटनेत रिसोड तालुक्यातील महागाव येथील श्री. जानोजी नामदेव हुंबाड हे मंदिरासमोर बसलेले असताना एका व्यक्तीने स्वतःला पोलीस असल्याचे सांगितले. "रिसोडमध्ये दंगल सुरू आहे. तुमच्या बोटातील सोन्याची अंगठी काढून खिशात ठेवा किंवा माझ्याकडे द्या," असे सांगून त्याने विश्वास संपादन केला. श्री. नामदेव यांनी अंगठी काढून त्या व्यक्तीकडे दिल्यानंतर आरोपी क्षणात तेथून पसार झाला.

दुसरी घटना मालेगाव तालुक्यातील धार पिंप्री येथे घडली. श्री. गणपत गालट हे पेट्रोल पंपावर दुचाकीत पेट्रोल भरत असताना एका व्यक्तीने स्वतःची ओळख पोलीस म्हणून करून दिली. "माझी मुंबईहून बदली झाली आहे. शहरात दंगल सुरू आहे. अंगठी काढून खिशात ठेवा किंवा माझ्याकडे द्या," असे सांगून त्याने विश्वास संपादन केला. श्री. गालट यांनी अंगठी त्याच्याकडे दिल्यानंतर आरोपी क्षणार्धात तेथून फरार झाला.




दोन्ही घटनांमध्ये आरोपींची बोलण्याची पद्धत, नागरिकांना घाबरवून विश्वास संपादन करण्याची युक्ती आणि फसवणूक करण्याची पद्धत पूर्णपणे एकसारखी असल्याने ही एकाच टोळीची कारवाई असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात आणखी अशाच प्रकारच्या घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात असून, विशेषतः वयोवृद्ध नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरम्यान, हे दोन्ही प्रकार अनुक्रमे रिसोड पोलीस ठाणे आणि मालेगाव पोलीस ठाणे यांच्या हद्दीत घडल्याने संबंधित पोलीस यंत्रणेसमोर या बनावट पोलीस टोळीचा छडा लावण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. या घटनांची गंभीर दखल घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमोरही या टोळीला जेरबंद करण्याची मोठी जबाबदारी निर्माण झाली आहे. आता आपल्या पोलिसी खाक्याचा धाक दाखवत ही टोळी किती लवकर गजाआड होते, याकडे संपूर्ण वाशिम

## दंगल सुरू असल्याचे सांगून नागरिकांचा विश्वास संपादन; महागाव व धार पिंप्री येथे एकाच पद्धतीने फसवणूक, ४ ते ५ जणांची टोळी सक्रिय असल्याची शक्यता – आरोपींना जेरबंद करण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान

जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दिवसाढवळ्या नागरिकांची फसवणूक करणाऱ्या या बनावट पोलीस टोळीने पोलिसांनाच खुले आव्हान दिल्याची चर्चा सुरू असून, या गुन्ह्याचा तातडीने छडा लावणे ही आता जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेची आणि प्रतिष्ठेची मोठी कसोटी ठरणार आहे. आरोपींना वेळीच जेरबंद करण्यात यश आले, तर नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होईल; अन्यथा या टोळीचे मनोबल वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

नागरिकांमध्ये या घटनांबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू असून, संबंधित ठाणेदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने विशेष तपास पथक नेमून आरोपींचा शोध घ्यावा व त्यांना जेरबंद करावे, अशी जोरदार मागणी होत आहे. वेळीच कारवाई झाली नाही, तर निष्पाप नागरिकांची आयुष्यभराची कमाई लुटणारी ही टोळी आणखी बळी शोधू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे या टोळीचा तातडीने पर्दाफाश करून कायद्याचा धाक निर्माण करण्याची वेळ आता आली आहे.

पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणतीही अनोळखी व्यक्ती स्वतःला पोलीस असल्याचे सांगून अंगावरील सोन्याचे दागिने काढण्यास सांगत असेल, तर त्यावर अजिबात विश्वास ठेवू नये. खरे पोलीस अशा पद्धतीने नागरिकांचे दागिने स्वतःकडे घेत नाहीत. संबंधित व्यक्तीचे अधिकृत ओळखपत्र पाहण्याची मागणी करावी. संशय आल्यास आजूबाजूच्या नागरिकांना आवाज द्यावा आणि तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.

आपल्या घरातील आई-वडील, आजी-आजोबा तसेच इतर वयोवृद्धांना या प्रकाराबाबत सावध करणे अत्यंत आवश्यक आहे. एक क्षणाची निष्काळजीपणा आयुष्यभराची कमाई हिरावून घेऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने सतर्क राहून हा इशारा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे.

# खांदा कॉलनी चौकात स्ट्रीट फूडचे साम्राज्य

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / केवल महाडिक** : खांदा कॉलनी चौक परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अनधिकृत स्ट्रीट फूड विक्रेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि चौकाच्या लगतच्या जागांवर अतिक्रमण करून व्यवसाय सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी वाहतुकीला अडथळा निर्माण होणे, पादचाऱ्यांना पदपथाऐवजी रस्त्यावरून चालण्याची वेळ येणे, तसेच आपत्कालीन वाहनांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, सायंकाळच्या वेळेत या परिसरात मोठ्या प्रमाणावर खाद्यपदार्थांच्या गाड्या उभ्या राहत असल्याने वाहनांच्या रांगा लागतात. रस्त्याच्या कडेला अनधिकृत पार्किंग, ग्राहकांची गर्दी आणि अतिक्रमण यामुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. याशिवाय स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सांडपाण्याची विल्हेवाट आणि अन्नसुरक्षेच्या निकषांचे पालन होत आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

**कायदेशीर बाबींकडे दुर्लक्ष?**

सार्वजनिक रस्त्यावर किंवा पदपथावर कोणतेही अतिक्रमण करणे अथवा वाहतुकीस अडथळा निर्माण करणारा व्यवसाय करणे हे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सक्षम प्राधिकरणांच्या नियंत्रणाच्या कक्षेत येते. अशा प्रकरणांमध्ये



संबंधित प्राधिकरणांना अतिक्रमण हटविणे, वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्याचे अधिकार आहेत.

तसेच, मोटार वाहनांमुळे किंवा रस्त्यावरील अडथळ्यांमुळे वाहतुकीवर विपरीत परिणाम होत असल्यास संबंधित वाहतूक यंत्रणा व प्रादेशिक परिवहन विभागाने आवश्यक ती समन्वयात्मक पावले उचलणे अपेक्षित असल्याचे कायदेविषयक जाणकारांचे मत आहे.

**महापालिका व प्रादेशिक परिवहन विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. संबंधित महापालिका प्रशासन, वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांनी संयुक्त पाहणी करून अतिक्रमण, अनधिकृत पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थापनाबाबत प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असतानाही त्याबाबत पुरेशी कार्यवाही दिसून येत नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**नागरिकांची प्रमुख मागणी**

### महापालिका व प्रादेशिक परिवहन विभागाच्या दुर्लक्षामुळे वाहतूक व नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

चौक परिसरातील अतिक्रमणाचे तातडीने सर्वेक्षण करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी.

वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत स्ट्रीट फूड गाड्यांवर नियमानुसार कारवाई करावी.

पदपथ पादचाऱ्यांसाठी मोकळे करून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी.

अन्नसुरक्षा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाबाबत नियमित तपासणी करावी.

महापालिका, वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांनी संयुक्त मोहीम राबवून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

दरम्यान, या संदर्भात संबंधित महापालिका प्रशासन, प्रादेशिक परिवहन विभाग किंवा इतर संबंधित अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका अद्याप प्राप्त झालेली नाही. ती प्राप्त झाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे या प्रकरणात वस्तुनिष्ठ चौकशी करून संबंधित नियमांनुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पिंपळयात विद्यार्थ्यांनी गाठला शेतकऱ्यांचा बांध; कृषी कार्यानुभवातून आधुनिक शेतीचा दिला संदेश!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : पिंपळा,(मालेगाव) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित कर्मयोगी बाबारावजी जोगदंड कृषी महाविद्यालय, आमखेडा येथील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून पिंपळा येथे सुरू असलेल्या कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष शेतीचा अभ्यास करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शेतात सुरू असलेल्या डवरणीच्या कामाची पाहणी करून त्यामागील वैज्ञानिक कारणे, त्याचे फायदे आणि आधुनिक शेतीतील महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगितले.

या उपक्रमादरम्यान गावातील प्रगतिशील शेतकरी महादेव भानुदास चौधरी, संदीप मधुकर चौधरी, संजय चौधरी, किसन चौधरी आणि वैभव पाठे यांच्या शेतांमध्ये सुरू असलेल्या डवरणीच्या कामाचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पिकांची वाढ, तणनियंत्रण, ओलावा संवर्धन, मुळांची जोमदार वाढ आणि उत्पादनवाढीसाठी डवरणीचे असलेले महत्त्व प्रत्यक्ष शेतात उभे राहून स्पष्ट केले. कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी अभिषेक वाळूकर, जगदीश जाधव, अजय सानप, शुभम सानप व राहुल राजपूत यांनी विविध शेतभेटी देत शेतकऱ्यांशी संवाद



साधला. कृषी कार्यानुभव कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतीतील कामकाजाचा अनुभव घेतला, तर शेतकऱ्यांनाही आधुनिक व शास्त्रीय शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळाली. त्यामुळे हा उपक्रम ज्ञानाची देवाणघेवाण घडवून आणणारा ठरला.

या कार्यक्रमासाठी गावच्या सरपंच श्रीमती राधाबाई ढगरे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच विष्णू भाऊ चौधरी, पवन भाऊ देवळे, रघुनाथ चौधरी, गोपाल देवळे यांच्यासह गावातील अनेक शेतकरी व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. एम. क्षीरसागर, उपप्राचार्य पी टी निचळ कार्यक्रम समन्वयक एस. टी. कव्हर, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एम. गायकवाड,प्रा. एस. बी. वाकुडकर, ए. जे. भोयर, एस. एस. शेख तसेच गोपाल पारिसकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कृषी कार्यानुभव कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतीतील तांत्रिक बाबी समजल्या, तर शेतकऱ्यांनाही आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळाल्याने हा उपक्रम गावात कौतुकाचा विषय ठरला.

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित कर्मयोगी बाबारावजी जोगदंड कृषी महाविद्यालय, आमखेडा येथील विद्यार्थ्यांचा कृषी कार्यानुभव कार्यक्रम; डवरणीच्या वैज्ञानिक महत्त्वाबाबत शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद**

**डवरणीचे प्रमुख फायदे**

१) तणांचे प्रभावी नियंत्रण होते.
२)जमिनीतील ओलावा अधिक काळ टिकून राहतो.
३)पिकांच्या मुळांची वाढ जोमदार होते.
४)जमिनीतील हवा खेळती राहून वाढ सुधारते.
५)खतांचा परिणाम अधिक प्रभावी होतो.
६)पिकांची वाढ व उत्पादनात लक्षणीय वाढ होते.
(७)शेती अधिक फायदेशीर आणि शाश्वत बनते.

# माहूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची महत्त्वाची बैठक संपन्न

## राजकीय परिस्थितीसह शेती व जनसामान्यांच्या प्रश्नांवर आ. शशिकांत शिंदे यांचे मंथन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड :प्रतिनिधी: सय्यद ईसा** : राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे आणि आ. सुनील भुसारा यांच्या नांदेड जिल्हा दौऱ्याच्या अनुषंगाने माहूर येथील विश्रामगृहात प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. देशातील व राज्यातील सद्य राजकीय परिस्थिती, फोडाफोडीचे राजकारण, शेतीचे संकट आणि सर्वसामान्यांपुढील गंभीर प्रश्नांवर या बैठकीत सविस्तर भाष्य करण्यात आले.आगामी काळात जनतेच्या हक्कांसाठी रस्त्यावरील आंदोलने तीव्र करण्याचे आवाहन करत, सर्वांनी एकत्र येऊन एकजूट टिकवावी. प्रामाणिकपणे गोरगरीब, कष्टकरी जनतेच्या प्रश्नांना घेऊन सामान्यांना न्याय देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे, मी आणि पक्ष तुम्हाला वेळोवेळी ताकद व मार्गदर्शन देईल, असा विश्वास आ.शशिकांत शिंदे यांनी यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना दिला.

या दौऱ्यादरम्यान सुरुवातीलाच नेत्यांनी दिवंगत माजी आमदार प्रदीप



नाईक यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबाची सांत्वना भेट घेतली. पक्षाची धुरा समर्थपणे सांभाळत असलेल्या मातोश्री बेबीताई प्रदीप नाईक व त्यांच्या परिवाराची ही विशेष भेट होती. तसेच, माहूरकडे येताना नांदेड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव यांच्याही निवासस्थानी त्यांनी धावती भेट दिली.

शुक्रवार, १७ जुलै रोजी सकाळी माहूरगडावर जाऊन रेणुका माता दर्शन घेतल्यानंतर, मान्यवरांनी माहूरचे नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नेत्यांनी दोसानी कुटुंबाचे आभार मानले. यावेळी कदरभाई दोसानी, फिरोज दोसानी, सरफराज दोसानी, जावेद दोसानी, सैफ दोसानी व कैफ दोसानी यांनी दोसानी परिवारातर्फे सर्व मान्यवरांचा विशेष सत्कार केला. तत्पूर्वी, स्थानिक विश्रामगृहात सर्व नेत्यांचे कार्यकर्त्यांतर्फे फटाक्यांच्या आतिषबाजीने जंगी स्वागत करण्यात आले होते.

या दौऱ्यादरम्यान महाविकास आघाडीतील मजबूत समन्वय आणि धर्मनिरपेक्षतेचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नांदेड जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांनीही या ठिकाणी उपस्थित राहून राष्ट्रवादीच्या नेत्यांचे स्वागत केले व त्यांच्याशी दिलखुलास राजकीय चर्चा केली. सर्वधर्मीय आणि विविध पक्षांच्या नेत्यांच्या या एकत्र येण्याने माहूरच्या राजकीय वर्तुळात या दौऱ्याची विशेष चर्चा रंगली आहे.

या प्रसंगी यवतमाळ जिल्हाध्यक्ष वर्षाताई निकम, ॲड. राहुल नाईक, ॲड. अर्चित नाईक, नांदेड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा किनवट तालुकाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, विधानसभा अध्यक्ष अनिल पाटील कऱ्हाळे, राज्य कार्याध्यक्ष जयवंत वानोळे, माहूर तालुकाध्यक्ष मेघराज जाधव, बंडू पाटील भुसारे, आत्माराम पाटील भुसारे, विधानसभा सरचिटणीस मनोज किर्तने, महिला आघाडी माहूर तालुकाध्यक्ष सौ. नम्रता मनोज किर्तने, अमजद पठाण, उकंडराव जाधव, निखिल जाधव, लक्ष्मण घुले, राहुल राठोड, अनिल पाटील हडसणीकर, आकाश कांबळे, तुराब अली, मारोती रेकुलवार, प्रफुल भुसारे,विकास राठोड, सुनील आडे, तानुभाई आदींसह महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# १७ जूनपासून बेपत्ता असलेल्या शेतकऱ्याचा अजूनही शोध सुरू; कुटुंबीयांची मदतीचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : चंद्रपूर शहरातील लालपेठ कॉलरी परिसरातील रहिवासी व शेतकरी श्री. गणेशराव उर्फ सुरेंद्र चंपतराव कडुकर (वय ५९) हे १७ जून २०२६ पासून बेपत्ता असून, जवळपास महिनाभर उलटूनही त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. त्यामुळे कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण असून, नागरिकांनी शोधकार्यात सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १७ जून रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास गणेशराव कडुकर हे नेहमीप्रमाणे सायकलने कामासाठी घराबाहेर पडले. मोबाईल फोन घरीच विसरण्याची त्यांना सवय असल्याने यावेळीही त्यांनी मोबाईल घरीच ठेवला होता. दुपारच्या सुमारास त्यांच्या कामाच्या ठिकाणावरील सहकाऱ्याचा फोन घरी आल्यावर ते त्या दिवशी कामावर पोहोचले नसल्याचे पत्नी सौ. वंदना कडुकर यांच्या निदर्शनास आले.

यानंतर मोबाईलमधील संपर्क क्रमांकावरून चौकशी केली असता, त्यांच्या एका मित्राने गणेशराव हे सकाळी ९ ते ९.३० वाजण्याच्या दरम्यान गंजवॉर्ड येथील त्याच्या सलूनमध्ये आले होते. तेथून ते आणखी दोन-तीन जणांसोबत मार्कंडा (ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) येथे बसने जात असल्याचे त्यांनी सांगितल्याची माहिती मिळाली.

कुटुंबीयांना सुरुवातीला ते रात्रीपर्यंत घरी परततील, अशी अपेक्षा होती. मात्र तसे न झाल्याने दुसऱ्या दिवसापासून नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिचितांनी विविध ठिकाणी शोधमोहीम



सुरू केली. मार्कंडा परिसर, बसस्थानके, रेल्वे स्थानके, रुग्णालये तसेच अन्य संभाव्य ठिकाणी शोध घेण्यात आला. मात्र अद्याप त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही.

कुटुंबीयांच्या माहितीनुसार, गणेशराव कडुकर यांना धार्मिक स्थळांना भेट देण्याची व देवपूजेत रमण्याची विशेष आवड आहे. त्यामुळे ते एखाद्या धार्मिक स्थळी किंवा वारीमध्ये गेले असावेत, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.शारीरिक वर्णन : वय ५९ वर्षे, उंची सुमारे ५ फूट ७ इंच, गव्हाळ वर्ण, चष्मा, पांढरे केस. अंगात पांढरा शर्ट, निळी फुल पॅन्ट, काळ्या रंगाच्या चप्पला, गळ्यात पांढरा दुपट्टा होता. त्यांच्याकडे काळ्या रंगाची उंच लेडीज सायकल असून सायकलला लाल रंगाची पिशवी होती.सदर व्यक्ती कोणाला आढळल्यास किंवा त्यांच्याबाबत कोणतीही माहिती असल्यास खात्री करून तातडीने ९६०४४६३१५७ किंवा ९१५६१९०२७४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन कुटुंबीयांनी केले आहे.

# बोर्लीत भ्रष्टाचार झाकण्यासाठी बनावट सहीचे कारस्थान?; ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद संशयाच्या भोवऱ्यात

## १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा हिशेब कुठे? विभागीय आयुक्तांच्या आदेशालाही केराची टोपली; तक्रारदाराचा गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी** : मुरुड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली येथे कथित आर्थिक गैरव्यवहार, संशयास्पद चौकशी प्रक्रिया आणि तक्रारदाराच्या नावाने बनावट सही करून पत्र तयार केल्याच्या आरोपांमुळे संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. आरटीआय कार्यकर्ते प्रतीक कणगी यांनी उघड केलेल्या या प्रकरणामुळे ग्रामपंचायत प्रशासनासह पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्या भूमिकेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेल्या "गणेश आळी ते नांदगावकर घरापर्यंत रस्ता" या कामामध्ये कागदोपत्री दाखवलेले काम आणि प्रत्यक्षात झालेले काम यामध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच "सुरई अंतर्गत गटार" या कामावर लाखो रुपयांचा खर्च दाखवण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात नवीन गटार बांधण्यात आले नसल्याचा दावा करण्यात आला आहे. जर काम झालेच नसेल, तर निधी गेला कुठे, हा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.१६ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती मुरुड येथे याबाबत लेखी तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर स्थळ पाहणी, अहवाल, चौकशी आणि कागदपत्रांची देवाणघेवाण झाली. मात्र अनेक महिने उलटूनही अंतिम चौकशी अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही. दोषींवर कारवाई नाही, निधीची वसुली नाही, गुन्हा दाखल नाही. त्यामुळे चौकशी ही सत्य शोधण्यासाठी होती की प्रकरण दाबण्यासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी कारवाईचे आदेश दिल्याचे सांगितले जाते. मात्र त्या आदेशानंतरही संबंधित यंत्रणांनी कोणती ठोस पावले उचलली नाहीत. जर विभागीय आयुक्तांच्या आदेशांनाही स्थानिक प्रशासन जुमानत नसेल, तर सामान्य नागरिकाने न्यायासाठी कोणाकडे पाहावे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे माहिती अधिकारातून समोर आलेले २० मार्च २०२६ रोजीचे एक पत्र. या पत्रावर तक्रारदार प्रतीक कणगी यांचे नाव आणि त्यांची असल्याचा दावा करण्यात आलेली सही आहे. मात्र कणगी यांनी असे कोणतेही पत्र दिले नसल्याचा दावा केला आहे. जर हा आरोप खरा असेल, तर हा केवळ




भ्रष्टाचाराचा विषय नसून शासकीय कागदपत्रांमध्ये बनावट सही करून पुरावे निर्माण करण्याचा गंभीर फौजदारी गुन्हा ठरू शकतो.

विशेष म्हणजे, ज्या पत्राच्या सत्यतेवरच प्रश्नचिन्ह आहे, त्याच पत्राचा संदर्भ अधिकृत अहवालांमध्ये वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे चौकशी प्रक्रियेची निष्पक्षता आणि प्रशासनाची भूमिका याबाबत गंभीर शंका निर्माण झाली आहे. खोट्या कागदपत्रांच्या आधारावर सत्य झाकण्याचा प्रयत्न झाला का, याचीही चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.याहून आश्चर्याची बाब म्हणजे, 'आपले सरकार' पोर्टलवर तक्रार निकाली काढल्याचे दाखवण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्षात ना अंतिम चौकशी अहवाल उपलब्ध आहे, ना दोषींवर कारवाई झालेली दिसते. मग तक्रार नेमकी निकाली कशी निघाली, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

आता हे संपूर्ण प्रकरण केंद्र सरकारच्या सीपीग्राम्स पोर्टलवर तसेच केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाकडे पोहोचले आहे. त्यामुळे या प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होण्याची मागणी जोर धरत आहे.

बोर्लीचे हे प्रकरण केवळ एका ग्रामपंचायतीपुरते मर्यादित नाही. राज्यभरातील ग्रामपंचायतींमध्ये विकासकामांच्या नावाखाली निधी खर्च दाखवणे, चौकशी लांबणीवर टाकणे, तक्रारदारांना त्रास देणे आणि प्रकरणे दडपण्याचे प्रकार होत असतील, तर त्यावर कठोर नियंत्रण आणण्याची वेळ आली आहे. ग्रामपंचायत ही गावच्या विकासाची पहिली पायरी मानली जाते; पण जर तेथेच पारदर्शकतेचा गळा घोटला जात असेल, तर लोकशाहीच्या मुळांवरच घाव बसत आहे.

**आता जनतेचे प्रश्न सरळ आहेत**

१५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा हिशेब कधी मांडला जाणार? विभागीय आयुक्तांच्या आदेशाचे पालन का झाले नाही? बनावट सही प्रकरणातील दोषींवर गुन्हा दाखल होणार का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रशासन अंतिम चौकशी अहवाल जाहीर करण्यास का घाबरत आहे?कागदोपत्री सत्य बदलण्याचे अनेक प्रयत्न होऊ शकतात; मात्र जनतेच्या पैशाचा हिशेब आणि न्यायाची मागणी कायम राहणार आहे. बोर्ली प्रकरणातील सत्य बाहेर येईपर्यंत आणि जबाबदारांवर कारवाई होईपर्यंत हा लढा थांबणार नसल्याचे आरटीआय कार्यकर्ते प्रतीक कणगी यांनी स्पष्ट केले आहे.

# तळाच्या गो. म. वेदक विद्यामंदिरात भव्य रक्तदान शिबीर संपन्न पोलीस अधिकारी, शिक्षक आणि पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य आणि स्वर्गीय बाळशेठ देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त गो. म. वेदक विद्यामंदिर, तळा येथे नुकतेच एका भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रक्तदात्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गो म वेदक विद्यामंदिर, डॉ प्र म जोशी प्रश्नाला पन्हेळी, प्राथमिक विद्यामंदिर या सर्व विभागाच्या वतीने हे रक्तदान शिबीर यशस्वी पार पडले. सदर शिबीर यशस्वी पार पडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.




दत्ता कुंटेवाड, प्राध्यापक भरत चाळके, श्री महादेव लोकरे, श्री मितेश मुळे, प्रा पाटील एन सी, श्री सुहास वावेकर आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.याप्रसंगी तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. संतोष दराडे, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. मंगेश देशमुख, उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री. महेंद्रशेठ कजबजे, खजिनदार श्री. चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्री श्रीराम कजबजे, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्री बी के पटेल, श्री लिलाधर खातू, प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, मुख्याध्यापक श्री महादेव लोकरे यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढवला.

रक्त संकलनाचे महत्वाचे काम सिव्हिल हॉस्पिटल, ब्लड सेंटर अलिबाग-रायगडच्या तज्ज्ञ वैद्यकीय पथकाने चोखपणे पार पाडले. यामध्ये डॉ. दिपक गोसावी, डॉ. बालाजी कदम, नवनाथ अळ्ळी, वैभव कांबळे, स्वप्नील जगताप, सुशांत भगत, मंगेश पिंगळा आणि महेश घाडगे यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले. या सामाजिक उपक्रमात स्वतः तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. संतोष दराडे, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विविध पदाधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. अमृतमहोत्सवी वर्षातील या कौतुकास्पद सामाजिक उपक्रमाचे तळा तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

# अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणाविरोधी कायद्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**दैनिक युवक आधार (छत्रपती संभाजीनगर) मराठवाडा प्रतिनिधी:-** रमेश सुरशे : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तथा एकता बहुउद्देशीय महिला मंडळ,कासारशिरसी,ता. निलंगा,जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजामाता विद्यालय येथे अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत निबंध व घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

"अंधश्रद्धामुक्त समाज निर्मितीत विद्यार्थ्यांची भूमिका" या विषयावर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विचार आणि सामाजिक उत्तरदायित्व यावर प्रभावी मते मांडली. यावेळी विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणाविरोधी कायद्याची माहिती देत वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमास मुख्याध्यापिका ए.

### राजमाता जिजामाता विद्यालयात निबंध व घोषवाक्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



बी.पाटील,मीना पोपळघट, शुभांगी वानखेडे,रंजना वाणी, सोनाली मोरे,अमोल महाले यांची उपस्थिती लाभली.

सदर जनजागृती उपक्रम छत्रपती संभाजीनगर जिल्हा समन्वयक वैभव परमेश्वर भालेराव व प्रतीक्षा भालेराव यांनी यशस्वीरीत्या राबविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालय प्रशासन,शिक्षकवृंद व एकता बहुउद्देशीय महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

# रहाटगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचा आनंदोत्सव

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : अमरावती येथील सामान्य रुग्णालय परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक संबधित कायदेशीर लढा स्मारक समितीने जिंकल्याने पुढील विस्ताराचा मार्ग मोकळा झाला त्याबद्दल रहाटगाव येथील आंबेडकरी संघटना व विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या संयुक्त विद्यमाने येथे आनंदोत्सव दिनांक १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजत साजरा करण्यात आला.

या प्रसंगी आंबेडकरी नेते मस्छिंद्र राऊत, विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, शहर अध्यक्ष रियाज खान, कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्माताई राजपूत, अफसर भाई, जीवन पचगाडे यांच्या नेतृत्वात राहाटगावच्या मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी विदर्भ राज्य तसेच बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला.

त्यानंतर येथील डॉ. बाबासाहेब स्मारक



सभागृहात सभा घेण्यात आली. यावेळी मस्छिंद्र राऊत, प्राचार्य डॉ. राजपूत, राजेंद्र आगरकर, रियाज खान, गुणवंत वाहने, भीमराव नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मस्छिंद्र राऊत यांनी सांगितले की आम्ही सदैव विदर्भ राज्य आंदोलन समितीसोबत आहोत कारण आमच्या सर्व प्रश्नांचे उत्तर स्वतंत्र विदर्भ राज्यात दडलेले आहे आणि आम्ही ते मिळवणारच !

यावेळी सचिन वानखेडे, संकेत चौधरी, प्रवीण वाकोडे, गजानन चक्रे, निलेश मोहोड, अजय वानखेडे, सूरज इंगळे, आशिष डोंगरे, किशोर वासनिक तसेच अनेक विदर्भवादी ग्रामस्थ सभेला उपस्थीत होते.

# बोरिवली स्थानक–अंबावाडी–पर्वत नगर–शैलेंद्रनगर मार्गावरील शेअर ऑटोचा मनमानी कारभार; क्षमतेपेक्षा दुप्पट प्रवासी, लाल सिग्नललाही हरताळ

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब :** बोरिवली रेल्वे स्थानक ते अंबावाडी, पर्वतनगर आणि शैलेंद्रनगर या मार्गावर धावणाऱ्या शेअर ऑटो रिक्षांचा मनमानी कारभार दिवसेंदिवस वाढत असून प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नियमानुसार शेअर ऑटोमध्ये केवळ तीन प्रवाशांना बसविण्याची परवानगी असताना अनेक चालक पाच ते सहा प्रवासी बसवून वाहतूक करत असल्याचे रोजच पाहायला मिळते. काही वेळा पुढील सीटवर चालकाच्या बाजूला दोन प्रवासी आणि मागील सीटवर तीन ते चार प्रवासी बसवले जातात. त्यामुळे प्रवाशांना अत्यंत कोंदट परिस्थितीत प्रवास करावा लागतो. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना, लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना तसेच विद्यार्थ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

या मार्गावर सकाळी कार्यालयीन वेळेत तसेच संध्याकाळी मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी असते. या गर्दीचा फायदा घेत काही शेअर ऑटोचालक अधिक पैसे कमावण्याच्या उद्देशाने क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवतात. अनेकदा प्रवाशांना अत्यंत कमी जागेत बसावे लागते, तर काही प्रवासी वाहनाच्या कडेला बसून धोकादायक पद्धतीने प्रवास करताना दिसतात. अशा प्रकारे प्रवास करताना अचानक ब्रेक लागल्यास किंवा अपघात झाल्यास गंभीर दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

इतकेच नव्हे तर अनेक शेअर ऑटोचालक वाहतूक नियमांचाही खुलेआम भंग करत असल्याचे दिसून येते. चौकांमध्ये लाल सिग्नल लागल्यानंतरही वाहन न थांबवता पुढे जाणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, झिगझॅग पद्धतीने वाहन चालवणे आणि इतर वाहनांना धोकादायक पद्धतीने ओव्हरटेक करणे अशा प्रकारांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे पादचारी, दुचाकीस्वार, चारचाकी चालक आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावर वाहतूक पोलिसांची कारवाई अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने नियमभंग करणाऱ्या चालकांचे धाडस वाढले आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसल्याची खंत प्रवाशांनी व्यक्त केली आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना अशा बेकायदेशीर आणि असुरक्षित प्रवासाचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

वाहतूक तज्ज्ञांच्या मते, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहून नेणे आणि लाल सिग्नलचे उल्लंघन करणे हे केवळ वाहतूक नियमांचे उल्लंघन नसून गंभीर अपघातांना निमंत्रण देणारे प्रकार आहेत. अशा नियमभंगामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठी जीवितहानी होऊ शकते.

नागरिकांनी वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन विभाग (RTO) आणि संबंधित प्रशासनाने बोरिवली स्थानक–अंबावाडी–पर्वतनगर–शैलेंद्रनगर मार्गावर विशेष तपासणी मोहीम राबवावी, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहून नेणाऱ्या आणि लाल सिग्नलचे उल्लंघन करणाऱ्या शेअर ऑटोचालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, तसेच या मार्गावर नियमित गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे.

# खोट्या अफवांना बळी पडू नका सोनाई दूध व नेचर डिलाईट प्रकल्पांमुळे इंदापूरच्या शेकडो कुटुंबांना रोजगार

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सोनाई दूध प्रकल्प आणि नेचर डिलाईट प्रकल्प यांच्याबाबत सोशल मीडियावर तसेच विविध माध्यमांतून खोट्या अफवा आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र,या अफवांमुळे केवळ दोन उद्योगांची नव्हे,तर संपूर्ण इंदापूर तालुक्याच्या औद्योगिक प्रतिमेची बदनामी होत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले उद्योजक दशरथ माने आणि अर्जुन देसाई यांनी आपल्या कष्ट, जिद्द आणि दूरदृष्टीच्या बळावर हे उद्योग उभे केले आहेत.या उद्योगांमुळे इंदापूर तालुक्यातील अनेक गरीब व गरजू युवक-युवती तसेच महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाला हातभार लागला असून तालुक्याच्या आर्थिक विकासालाही चालना मिळत आहे.

सध्या हे दोन्ही प्रकल्प सुरळीतपणे सुरू असून त्यांच्या माध्यमातून इंदापूर तालुक्याची ओळख राज्यासह देशभर पोहोचली आहे.अशा परिस्थितीत कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय अफवा पसरवणे किंवा उद्योगांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करणे हे तालुक्याच्या हिताविरोधात असल्याचे मत अनेक नागरिक व्यक्त करत आहेत.काही बाहेरील व्यावसायिक स्पर्धा,वैयक्तिक स्वार्थ किंवा राजकीय आकसापोटी दिशाभूल करणारे गैरसमज पसरवले जात असतील,तर अशा अफवांवर विश्वास ठेवण्यापूर्वी नागरिकांनी वस्तुस्थितीची खात्री करून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही उद्योगाबाबत बिनबुडाचे आरोप किंवा अपप्रचार केल्यास त्याचा थेट परिणाम त्या उद्योगाशी निगडित कामगार, शेतकरी,युवक आणि त्यांच्या कुटुंबांवर होऊ शकतो. इंदापूर तालुक्याच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यामुळे खोट्या अफवांना बळी न पडता,रोजगार निर्माण करणाऱ्या उद्योगांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन सुजाण नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# माहोरा येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी विनम्र अभिवादन



**दैनिक युवक आधार**

**भाऊसाहेब आव्हाड (माहोरा सर्कल प्रतिनिधी)** : दि. 18 जुलै 2026 रोजी माहोरा येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी करत असताना गावचे ज्येष्ठ नागरिक ( सरपंच)गजानन पाटील लहाने (उपसरपंच) भास्कर सोनवणे (लहू शस्त्र सेना तालुका युवा अध्यक्ष) भाऊसाहेब आव्हाड (पत्रकार) बालासाहेब गवले. साहेब व समाज बांधव बाबुराव साबळे, प्रभाकर साबळे, विजय साबळे, प्रदीप साबळे, नागेश, पांडव सुदाम साबळे, गजानन साबळे ,महेंद्र साबळे ,राजू साबळे ,सचिन साबळे ,बबलू गायकवाड, गावातील नागरिक सिताराम खरात, श्याम पाटील लहाने, तुकाराम शिरसाट,सर्वांनी पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले

# अतिवृष्टीग्रस्त भागांचा मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याकडून आढावा

## पंचनामे तातडीने पूर्ण करून भरपाई प्रस्ताव पाठवा; दोषी अधिकारी–ठेकेदारांवर कारवाईचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :-सचिन पवार**

**रायगड :-**महाड विधानसभा मतदारसंघात जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली महाड येथील संत रोहिदास सभागृहात सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी महाड प्रांताधिकारी पोपट ओमासे, महाड तहसीलदार महेश शितोळे, पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे,महाड शहर , तालुका, एमआयडीसी पोलिस ठाण्याचे अधिकारी,माणगावचे तहसीलदार तसेच महसूल, कृषी, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, एसटी महामंडळ आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीत अतिवृष्टीमुळे बाधित नागरिक, व्यापारी आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर पूर्ण करून भरपाईचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठविण्याचे निर्देश मंत्री गोगावले यांनी दिले.

औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषित सांडपाण्यामुळे नुकसान झालेल्या शेतीचाही स्वतंत्र पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश कृषी विभागाला देण्यात आले.

रस्ते तातडीने सुरू करण्याचे आदेश दरडी कोसळणे, रस्ते खचणे आणि पूरस्थितीमुळे बंद पडलेले ग्रामीण रस्ते व राष्ट्रीय महामार्ग तातडीने दुरुस्त करून वाहतुकीसाठी खुले करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभागाला देण्यात आल्या.अकार्यक्षम अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाबाबत लोकप्रतिनिधी आणि पत्रकारांनी केलेल्या तक्रारींची दखल घेत मंत्री गोगावले यांनी संबंधित अधिकारी सांगावकर यांच्याविरोधात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे तक्रार करून कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.



महाड जलवाहिनी प्रकरणातही कारवाई महाड शहराच्या पाणीपुरवठा जलवाहिनीच्या गाळ काढण्याच्या कामातील हलगर्जीपणाबाबत संबंधित ठेकेदार व पालिका अधिकाऱ्यांकडून झालेल्या नुकसानीची भरपाई वसूल करून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. प्रशासनाकडून नुकसानीचा आढावा बैठकीच्या प्रारंभी महाड, पोलादपूर व माणगावच्या तहसीलदारांनी तालुकानिहाय नुकसानीचा आढावा सादर केला. दरडग्रस्त व पूरग्रस्त गावांमध्ये पालक अधिकारी व संपर्क अधिकारी नियुक्त करण्यात आले असून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज असल्याची माहिती त्यांनी दिली.

कृषी नुकसानीचे पंचनामे सुरू कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, महाड तालुक्यात ५९ हेक्टर क्षेत्रातील सुमारे २०० शेतकरी, तर पोलादपूर तालुक्यात २.३२ हेक्टर क्षेत्रातील १५२ शेतकऱ्यांच्या शेती नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित काम सुरू आहे. आंबा व काजू बागांच्या नुकसानीचीही नोंद करण्यात आली आहे.शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यासाठी बँक खात्याची केवायसी (KYC) पूर्ण असणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने सांगितले. त्यानुसार जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच यांनी गावातील शेतकऱ्यांची केवायसी पूर्ण करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मंत्री गोगावले यांनी केले.खाडीपट्ट्यातील शेती नुकसानीचा स्वतंत्र अहवाल भरती-ओहोटी तसेच औद्योगिक सांडपाण्यामुळे खाडीपट्ट्यातील शेतीचे नुकसान झाल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत कृषी विभागामार्फत पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य मन्सूर ताज यांनी औद्योगिक विकास महामंडळाकडून अशा शेतकऱ्यांना अतिरिक्त भरपाई देण्याची मागणी केली. माजी सभापती सिताराम कदम यांनी पशुधनाच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून भरपाई देण्याची मागणी केली.दरडग्रस्त गावांसाठी निवारा शेड दरडग्रस्त गावांमध्ये मंजूर निवारा शेडचे काम पुढील वर्षापर्यंत पूर्ण केले जाईल,असे मंत्री गोगावले यांनी सांगितले. तसेच आंबेत पुल बंद होण्यास कारणीभूत ठरलेल्या बार्ज मालकांची चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले.स्मार्ट मीटर व एसटी सेवेबाबत निर्देशमहावितरण विभागाला स्मार्ट मीटर संदर्भातील नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच एसटी महामंडळाला ग्रामीण भागातील बससेवा पूर्ववत सुरू करण्याबरोबरच निजामपूर–ताम्हिणी–पुणे आणि महाड–रत्नागिरी बससेवा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**कोकणातील शेतकऱ्यांसाठी विशेष भरपाईची मागणी करणार**

बैठकीच्या शेवटी मंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले की, यंदा पाऊस उशिरा सुरू झाल्यानंतर पेरणी केलेली रोपे अतिवृष्टीमुळे कुजून गेली. कोकणात दुबार पेरणीची शक्यता नसल्याने येथील शेतकऱ्यांना राज्यातील इतर भागांप्रमाणे विशेष नुकसानभरपाई मिळावी, यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल.तसेच २०२१ च्या महापुरानंतर सलग तीन वर्षे नद्यांमधील गाळ काढल्यामुळे यंदा २०२१ इतकाच पाऊस होऊनही पूरपातळी कमी राहिली आणि नुकसानही कमी झाले, असा दावा त्यांनी केला. याबाबत टीका करणाऱ्यांनी सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित राहिले नसल्याचा टोला देखील त्यांनी लगावला.बैठकीचा समारोप प्रांताधिकारी पोपट ओमासे यांनी आभार प्रदर्शनाने केला.

---

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे नेते हनुमंत बसवद यांनी सामाजिक ऐक्याचा संदेश देत समाजात वाढत असलेल्या मतभेदांबाबत चिंता व्यक्त अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपा असे आवाहन त्यांनी केले.

आरक्षण तर आपल्या खिशात आहे ते कधीही घेऊ. परंतु एकदा मतभेद झाले तर ते कसे जोडणार असेही त्यांनी सांगितले. बौद्ध, मातंग, चर्मकार, वाल्मिकी आदिवासी भाईचारा ऐक्य अभियान यावेळी सुरू झाले असून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभरात हे अभियान




सुरू राहणार आहे असे शाहिर रमेश बल्लाळ यांनी सांगितले.

अण्णा भाऊ साठे यांचे नातू सचिन साठे, सुनबाई सावित्रीबाई साठे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी संजय साठे, किसन साठे, भगवान चव्हाण, रामचंद्र कांबळे, प्रकाश बल्लाळ, नेत्रा बसवद, शुभांगी बसवद, संभाजी चव्हाण, अनिकेत गेवदे, सुनील गेवदे, संगीता बल्लाळ उपस्थित होते.

---

# पुल्लर गाव शेजारील तलावाची पावसाळयात होणारी गळती थांबवा – नारायण उदापुरे

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपुर-** जिल्ह्यात भिवापुर पासून उत्तर दिशेला 12 Km अंतरावर पुल्लर गाव आहे . आणि गावा शेजारी थोड्या उंचावर गाव तलाव आहे . पावसाळयात तलाव पूर्ण भरल्यास तलावाच्या आतील काठाने पाण्याची गळती होत राहते . पर्यायाने गळतीमुळे गावातील काही घरांना ओलावा, तर काही घरांना पाण्याचे झरे लागतात . [ परिणाम - घरांना सतत ओलाव्यामुळे, संधिवात, तिडक्या वात, चक्कर येणे, पाय सुजन, अनेक बिमाऱ्या थंडीमुळे घडूण येतात ] यातून सावधानतः बाळगण्यासाठी स्थानिक पातळीवर नेतृत्व



घेऊन तलावाची विशीष्ट ठिकाणवरून येणारी गळती मुळे नागरीकांना होणाऱ्या त्रासांबद्धल शासन, प्रशासन आणि स्थानिक जनप्रतिनिधी यांनी या संदर्भात प्रयत्नशील पाऊल उचलावे असे मागणी नागपूर जिल्हा ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष नारायण उदापूरे यांनी केलेली आहे

---

# निफाडच्या राजकारणात मोठा भूकंप!; मुकुंदराजे होळकर, जावेद शेख, संजयदादा कुंदे व बंडूनाना कुंदे भाजपच्या वाटेवर?









**नगरपंचायत निवडणुकीपूर्वी मोठी राजकीय घडामोड; मुकुंदराजे होळकर थेट जनतेतून नगराध्यक्षपदाच्या रिंगणात उतरण्याची शक्यता, कार्यकर्त्यांचा एकमुखी आग्रह**

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड शहराच्या राजकीय वर्तुळात आगामी नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठी राजकीय घडामोड घडत असून, शहरातील विविध पक्षांतील प्रभावी नेत्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), माजी उपनगराध्यक्ष व नगरसेवक जावेद शेख (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट), माजी उपनगराध्यक्ष पती संजयदादा कुंदे (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तसेच बंडूनाना कुंदे (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट) हे आपल्या समर्थकांसह लवकरच भाजपमध्ये जाहीर प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

हा पक्षप्रवेश राज्याचे ज्येष्ठ नेते व मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत तसेच भाजप नेते यतीन पाटील कदम यांच्या विशेष पुढाकारातून पार पडणार असल्याचे सांगितले जात आहे. या प्रवेशामुळे निफाडच्या राजकीय समीकरणात मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**मुकुंदराजे होळकर यांच्या निवासस्थानी रणनीतीची बैठक**

या राजकीय निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर यांच्या निफाड येथील निवासस्थानी समर्थक, कार्यकर्ते आणि हितचिंतकांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत आगामी नगरपंचायत निवडणुकीची रणनीती, शहराच्या विकासाचा आराखडा आणि बदलत्या राजकीय परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला.

बैठकीदरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या निर्णयाला एकमुखी पाठिंबा दर्शवित, आगामी निवडणुकीत एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

**नगराध्यक्षपदासाठी मुकुंदराजे होळकर यांच्यावर कार्यकर्त्यांचा आग्रह**

बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे आगामी नगरपंचायत निवडणुकीत मुकुंदराजे होळकर यांनी थेट जनतेतून नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवावी, असा ठराव कार्यकर्त्यांनी एकमताने मंजूर केला. कार्यकर्त्यांच्या प्रचंड आग्रहामुळे होळकर यांनीही सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगितले जात असून, त्यामुळे आगामी निवडणूक अधिक चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत.

**भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

या बैठकीस भाजप शहराध्यक्ष नवनाथ धारराव, जिल्हाचिटणीस तथा निफड मंडल प्रभारी संजय गाजरे, सचिन धारराव, गौरव व्यवहारे, निलेश शिंदे, गणेश कापसे, दीपक भापकर यांच्यासह मुकुंदराजे होळकर यांचे असंख्य समर्थक, कार्यकर्ते आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे**

नगरपंचायत निवडणुकीच्या तोंडावर विविध पक्षांतील प्रभावी नेत्यांचा भाजपकडे होणारा संभाव्य कल हा निफाडच्या राजकारणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या पक्षप्रवेशामुळे भाजपची संघटनात्मक ताकद वाढण्याची शक्यता असून, आगामी निवडणुकीत त्याचा थेट परिणाम दिसून येऊ शकतो. त्यामुळे निफाडमधील नगरपंचायत निवडणूक यंदा अत्यंत अटीतटीची आणि प्रतिष्ठेची ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

---

# "एन शेषागिरी रावसर, व शिवानंद चौगुला यांनी श्री क्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर पदयात्रेने घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर :** सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरी रावसर यांनी सालाबाद प्रमाणे चालू वर्षी सुद्धा आषाढी एकादशीचे औचित्य साधून श्रीक्षेत्र आळंदी ते पंढरपूर सर्व घटकांना सुखी संपन्न दीर्घायुष्य लाभण्यासाठी आणि सर्व शेतकरी बांधवांना सुख समृद्धी लाभण्यासाठी श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर पदयात्रेचे आयोजन केले होते. त्यांच्यासोबत सोमा एंटरप्राईजेसचे शिवानंद चौगुला



(बेळगाव) हेही सहभागी झाले होते. ज्ञानोबा तुकाराम यांच्या जयघोष यामध्ये आणि शेतकरी राजाला सुख समृद्धी लाभू दे यासाठी पदयात्रेतून प्रवास करत असताना जागोजागी त्यांचे अनेक शेतकरी बांधव त्याचप्रमाणे सद्गुरु परिवाराचे सदस्य हे त्यांचा सन्मान करीत होते. माळशिरस तालुक्यात प्रवेश करतात सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब कर्नवर पाटील यांच्या परिवारातर्फे तर पंढरपूर तालुक्यात प्रवेश करताच सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे संचालक मोहनराव बागल व त्यांचे सहकारी त्याचप्रमाणे असंख्य सभासद बांधव व ग्रामस्थांनी या पदयात्रेच्या निमित्ताने त्यांचा सन्मान करून अशा प्रकारचा त्यांचा ध्येयवादी प्रवास अतिशय चांगल्या पद्धतीचा असून समाजाला दिशा देणारा आहे अशा प्रकारचे अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीक्षेत्र पंढरपूर येथून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतल्यानंतर सद्गुरु श्री श्री साखर कारखान्यावरती त्यांचा सन्मान एच आर अँड एडमिन मॅनेजर सचिन खटके, कॅन मॅनेजर सुनील सावंत, सिविल इंजिनिअर अवधूत जमदाडे, शेती अधिकारी दत्ता क्षिरसागर,ॲग्री सुपरवायझर पिसे व सर्व खाते प्रमुख कर्मचारी बांधवांनी पुष्पहार श्रीफळ शाल देऊन केला. सदर पद यात्रेच्या संदर्भात सुनील सावंत यांनी गौरवोद्गार काढून सर्वांच्या वतीने समाधान व्यक्त केले.

---

# अभ्यासाच्या वेळेतच वीज खंडित; सलग चार दिवस पापळ एजी मिक्स फीडर बंद

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने :** जाफराबाद तालुक्यातील पापळ एजी मिक्स फीडरमधून वीजपुरवठा होणाऱ्या गावांमध्ये सलग चार दिवसांपासून संध्याकाळी ७ ते रात्री १० या वेळेत वीजपुरवठा बंद ठेवला जात असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दररोज अभ्यासाच्या आणि घरगुती कामकाजाच्या महत्त्वाच्या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने परिसरात विंचू, साप तसेच इतर विषारी प्राण्यांचा वावर वाढला आहे. वीज नसल्यामुळे संपूर्ण परिसर अंधारात बुडत असून घराबाहेर पडताना नागरिकांना भीती वाटत आहे. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.



वीजपुरवठा बंद असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर गंभीर परिणाम होत आहे. संध्याकाळी अभ्यासाची वेळ असताना अंधारामुळे अनेक विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नाही. इन्व्हर्टर किंवा पर्यायी वीजव्यवस्था नसलेल्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची पालकांची तक्रार आहे.

याशिवाय, डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून वीज नसल्यामुळे पंखे बंद राहतात. त्यामुळे नागरिकांना रात्री डासांचा त्रास सहन करावा लागत असून झोप पूर्ण होत नाही. त्यामुळे आरोग्याच्या समस्या वाढण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे.

शेतकरी वर्गालाही याचा फटका बसत असून वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतीसाठी आवश्यक कामे आणि पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याचे सांगितले जात आहे.

परिसरातील नागरिकांनी महावितरणकडे तातडीने या समस्येची दखल घेण्याची मागणी केली आहे. सलग चार दिवस सुरू असलेली संध्याकाळची वीजबंदी त्वरित बंद करून नियमित व अखंड वीजपुरवठा सुरू करावा, तसेच वीजबंदीचे कारण स्पष्ट करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

# महाराष्ट्र सदन येथे तीन दिवसीय वस्त्रोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, नागपूर (महाटेक्स) आणि येथील महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने कस्तुरबा गांधी मार्गावरील नवीन महाराष्ट्र सदनात आयोजित विशेष वस्त्रोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव श्वेता सिंघल यांच्या हस्ते झाले.

प्रगती मैदान येथील भारत मंडपममध्ये नुकत्याच झालेल्या 'भारत टेक्स २०२६' च्या धर्तीवर महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रोद्योग परंपरेचा परिचय दिल्लीकरांना करून देण्यासाठी कस्तुरबा गांधी मार्गावरील नवीन महाराष्ट्र सदन येथे १८ ते २० जुलै २०२६ या कालावधीत या तीन दिवसीय वस्त्रोद्योग प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती सिंघल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार आणि व्यवस्थापक प्रमोद कोलापटे उपस्थित होते. तसेच रेशीम संचालनालयाचे उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे, रेशीम विकास अधिकारी संदीप आगवणे, अशोक वडवले, महाटेक्सचे गणेश ठाकूर, रूपेश खापेकर आदी उपस्थित होते. दिल्लीतील नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन महाराष्ट्रातील विणकर आणि कारागिरांकडून दर्जेदार उत्पादने थेट खरेदी करून 'व्होकल फॉर लोकल' संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन निवासी आयुक्त श्वेता सिंघल यांनी केले.

'भारत टेक्स २०२६'मध्ये महाराष्ट्राच्या दालनाला देश-विदेशातील खरेदीदारांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# मिशन ऑरेंज सिटी

## रामगिरी परिसरात मुख्यमंत्री यांनी लावले संत्रावृक्ष



**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव** : मिशन ऑरेंज सिटी उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज रामगिरी निवासस्थानी संत्रावृक्षाचे झाड लाऊन मोहिमेचा शुभारंभ केला.

यावेळी महापौर नीता ठाकरे, आमदार परिणय फुके, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी, महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक अतुल पांडे तसेच अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते . मिशन ऑरेंज सिटी हा उपक्रम दैनिक महाराष्ट्र टाईम्स या ग्रुप तर्फे राबविण्यात येत आहे . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्यात. महाराष्ट्र टाइम्सच्या उपक्रमास मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या.

# खालापूर प्रेस क्लबचा उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार मान यावर्षी सौ.संध्या हनुमंत मोरे यांना मिळाला

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे** : खालापूर तालुक्यात पत्रकार क्षेत्रामध्ये प्रेस क्लब खालापूर यांच्यामार्फत देण्यात येणारा उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार शेताच्या बांधावर जाऊन सन्मानीय शेतकऱ्याचा गुणगौरव आणि सन्मान करण्याची परंपरा कायम ठेवत स्वर्गीय पत्रकार संतोष पवार यांच्या संकल्पनेतून दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो खालापूर तालुक्यात शेतकरी शेती करत नसल्याकारणाने अनेक शेत ओसाड पडली याची खंत असल्यामुळे आपण काहीतरी करूया जेणेकरून पुन्हा शेती करायला लागतील या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्याचा सन्मान सत्कार करून इतर शेतकऱ्यांना सुद्धा केलेल्या सन्मानाने प्रेरित होऊन शेती व्यवसायाकडे ओढ लागावी या दृष्टिकोनातून राबवलेला हा संकल्प भरारी घेताना पाहवयास मिळत आहे



आज परखंड शिंदेवाडी येथील पत्रकार श्री हनुमंत मोरे यांच्या सौभाग्यवती शेतीबरोबर जोड व्यवसाय म्हणून कोंबडी पालन, शेळीपालन आणि गाई पालन करून एक आदर्श शेतकरी मान मिळवला आहे. गेल्या वर्षी याच भागातील अर्पिता अमित पाटील यांना हा पुरस्कार मिळाला होता त्यांच्या गावामध्ये अनेक शेतकरी शेती करत नव्हते त्यांना मिळालेल्या पुरस्काराने गावातील इतर शेतकरी सुद्धा शेती करून लागल्याने परखंदे शिंदेवाडी वावोशी अनेक गावांमधून प्रेरित होऊन अत्याधुनिक शेती करण्यास सुरुवात झाली आहे त्यामुळे प्रेस क्लब खालापूर यांनी सुरू केलेली संकल्पना जणूकाही नवसंजीवनी निर्माण करत आहे यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संतोष बैलमारे, पंचायत समिती सदस्या प्रमिला पाटील, पर्यावरण प्रेमी मनीष खवळे, होराळे सरपंच नीलम भुईकोट,शिरवली सरपंच महेश पाटील, माजी उपसरपंच सुरेखा दळवी, सदस्य लता भोसले, माजी सरपंच गणेश पवार, रमेश गायकवाड, माजी सदस्य ललिता जाधव, सुभाष मोरे, सहाय्यक कृषी अधिकारी अनिल कोळी, रावसाहेब आंधळे, मुक्ताजी शेटे, माजी सरपंच होराळे प्रकाश पाटील, रवींद्र मोरे, सागर भुईकोट, मंगेश काइनकर,विजय पाटील,संतोष हातनोलकर,राजू भोसले, रोहिदास पाटील,भाऊ पाटील, राजू जाधव,पत्रकार जेष्ठ बाबू पोटे, संदीप ओव्हाल,अमित भोपतराव,मुकुंद बेंबडे, दत्ता शेडगे,संतोष शेवाळे,सारिका सावंत,अंकुश मोरे,हनुमंत मोरे,दीपक जगताप,अभिजीत देरेकर तसेच रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, खालापूर प्रेस क्लब अध्यक्ष भाई ओव्हाल, सचिव रवींद्र मोरे,उपाध्यक्ष एस टी पाटील, उपाध्यक्ष काशीनाथ जाधव, खजिनदार समाधान दिसले, सहखजिनदार संतोषी म्हात्रे, प्रसिद्धीप्रमुख नवज्योत पिंगळे, बंटी साळुंखे उपस्थित होते.

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत बोधगया येथे विशेष तीर्थयात्रा रेल्वेचे प्रस्थान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना राज्यातील नागरिकांना देशातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण तीर्थस्थळांचे दर्शन सुलभपणे घडवून आणण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. समाजातील विविध घटकांना अध्यात्म, सांस्कृतिक वारसा आणि राष्ट्रीय एकात्मतेची अनुभूती मिळावी, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे.




मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत मुंबई विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील ८०० पात्र लाभार्थ्यांसाठी बोधगया (बिहार) येथे विशेष तीर्थयात्रा रेल्वेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर विशेष रेल्वे दि. २० जुलै २०२६ ते दि. २६ जुलै २०२६ या कालावधीत बोधगया येथे जाणार आहे.या विशेष तीर्थयात्रा रेल्वेचा शुभारंभ दि. २० जुलै २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता दादर रेल्वे स्थानक, प्लॅटफॉर्म क्र. 14 येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री. एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्रीम.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य ,मा.ना.श्री. संजय शिरसाट, मंत्री सामाजिक न्याय, मा.ना.श्रीम.माधुरीताई मिसाळ, राज्यमंत्री,सामाजिक न्याय , मा.डॉ.हर्षदीप

कांबळे,(भा.प्र.से) प्रधानसचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मा.श्रीम.दीपा मुधोळ-मुंढे (भा.प्र.से.)

आयुक्त,समाजकल्याण इ.मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या विशेष तीर्थयात्रेद्वारे लाभार्थ्यांना भगवान गौतम बुद्ध यांनी ज्ञानप्राप्ती केलेल्या बोधगया या जागतिक किर्तीच्या पवित्र स्थळाला भेट देण्याची संधी उपलब्ध होणार आहे. बौद्ध धम्माच्या इतिहासात बोधगया हे अत्यंत महत्त्वाचे श्रद्धास्थान मानले जाते. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत आयोजित या विशेष रेल्वे प्रवासामुळे राज्यातील पात्र लाभार्थ्यांना सुरक्षित, सुसंघटित व सुलभ पद्धतीने तीर्थदर्शनाचा लाभ मिळणार असून, शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमांना अधिक बळकटी मिळणार आहे.तरी सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत मा.श्री.बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण मुंबई विभाग , मुंबई यांनी आवाहन करण्यात आले आहे.

(किरण म्हेत्रे) समाज कल्याण अधिकारी, बृहन्मुंबई.

# देगलूर–बिलोलीतील विविध प्रश्नांवर आ.अंतापूरकरांचा प्रशासनाला जाब

## पाणीटंचाई,विजप्रश्न,पीकविमा,आधारकेंद्र ते अवैध रेती उत्खनन.आमदार जितेश अंतापूरकर यांनी मांडले जनतेचे प्रश्न.

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी: महादेव उप्पे**

**देगलूर( दि.१९)** : जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांवर आमदार जितेश अंतापूरकर यांनी प्रशासनाला जाब विचारत जनहिताच्या मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडली. वीजपुरवठा,पीक विमा, अवैध रेती उत्खनन, स्मशानभूमी विकास,पाणी टंचाई प्रश्न तसेच इतर पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी करत पालकमंत्री अतुल सावे यांचे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नाकडे लक्ष वेधले.

बैठकीत आ.जितेश अंतापूरकर यांनी महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्याचा मुद्दा प्राधान्याने उपस्थित केला. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा,कमी दाबाने वीज मिळणे,कृषीपंपांना वेळेवर वीज उपलब्ध न होणे आणि तांत्रिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील नागरिक व शेतकरी त्रस्त असल्याचे त्यांनी सांगितले. वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

पीक विमा योजनेतील हमीपत्राचा त्यांनी मुद्दा उपस्थित केला.गावागावांतील स्मशानभूमींमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आणत रस्ते, संरक्षक भिंती,पिण्याचे पाणी,वीज आणि शेड आदी सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली.अवैध रेती उत्खननामुळे पर्यावरणाची हानी,महसुलाचे नुकसान आणि नागरिकांना होणारा त्रास याकडेही त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.या प्रकारांवर कठोर कारवाई करून संबंधित यंत्रणांनी प्रभावी अंमलबजावणी करावी,अशी मागणी त्यांनी केली.

याशिवाय मतदारसंघातील विविध विकासकामे,रस्ते, पाणीपुरवठा,सार्वजनिक सुविधा आणि अन्य प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाने निश्चित कालमर्यादेत कार्यवाही करावी,अशी मागणी अंतापूरकर यांनी बैठकीत केली.

या बैठकीस जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे,माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खा.अशोकराव चव्हाण,खा.अजित गोपछडे,खा.रवींद्र चव्हाण,जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदार तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**आधार केंद्र तात्काळ चालू करा**

विधानसभा मतदारसंघातील शहर व ग्रामीण भागातील नागरीकांचे आधार केंद्र निगडीत सर्व प्रकीया सुलभ व्हावी,अशी मागणी आ. जितेश अंतापूरकर यांनी यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडे मागणी केली

# लाखनी निसर्गमहोत्सवाला बिजोत्सव उपक्रमांद्वारे सुरुवात

## ग्रीन नेचर फाउंडेशनचा नेचर पार्कवर बिजोत्सव 2026 च्या कार्यक्रमाचे आयोजन




**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : लाखनी येथील ग्रीन नेचर फाउंडेशन अर्थात ग्रीनफ्रेंड्स नेचर क्लब लाखनी तर्फे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा लाखनी निसर्गमहोत्सव 2026 ची पर्यावरण दिनापासून करण्यात आली .यावर्षी सुद्धा लाखनी नेचर पार्कवर बिजोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ग्रीन नेचर फाउंडेशनचे पदाधिकारी अशोक वैद्य, सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ नागरिक भैय्याजी बावनकुळे,अशोक नंदेश्वर, संजय बोपचे सालेभाटा व कार्यवाह प्रा. अशोक गायधने हे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी प्रा.अशोक गायधने यांनी बीज संकलन स्पर्धाचे पर्यावरण दृष्टिकोनातून महत्व समजावून दिले .उपस्थित सर्वच प्रमुख अतिथींनी बीज संकलनाचे महत्व विशद केले.

लाखनी निसर्गमहोत्सव व बिजोत्सव निमित्ताने नेचर पार्कवर बीज राजा -बीज राणी, सिडबॉल तयार करणे व बीज संकलन स्पर्धा घेण्यात आली.

बीज संकलन स्पर्धेत राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालयाच्या कुणाली बोपचे, आराध्या बोपचे व हर्षिता बोपचे यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात आला. तर माऊली इंग्लिश स्कूल मधून अभिधा विनोद थोटे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. जिल्हा परिषद गांधी यांच्याकडे विद्यालय लाखनी येथून सिडबॉल अर्थात बिजगोळे बनवा स्पर्धेत सार्थक लाडे, हास्य निर्वाण, शौर्य नागलवाडे , गायत्री मरसकोल्हे यांना प्रथम क्रमांक तर गुणेश गिऱ्हेपुंजे, शबनम भालेराव, प्रांजली मेश्राम यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.बीज राजा बीज राणी स्पर्धेत बियांपासून सुशोभित बीज पट्टे तयार करण्यात प्रथम क्रमांक हर्षिता बोपचे हिला तर द्वितीय क्रमांक आराध्या बोपचे यांना प्राप्त झाला.कार्यक्रमाचे संचालन प्रा अशोक गायधने यांनी तर आभार प्रदर्शन अशोक वैद्य यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नगर पंचायत लाखनीचे क्रियाशील सभासद संदीप भांडारकर,जि.प. गांधी विद्यालयाच्या शिक्षिका वैशाली गायधनी तसेच प्राचार्य प्रदीप गायधनी तसेच वाहतूक नियंत्रक श्याम गिऱ्हेपुंजे यांनी अथक परिश्रम घेतले.

# पायाभूत सुविधांच्या विकासामुळे २०३० पर्यंत पुणे देशाचे 'ग्रोथ इंजिन' बनणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे** : पुणे शहर हे भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) आणि जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख केंद्र बनण्याच्या मार्गावर असून सन २०३० पर्यंत पुणे हे देशातील अत्यंत आधुनिक शहर व प्रमुख विकास केंद्र (ग्रोथ इंजिन) म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. शहराची वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्य शासनाने पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि हडपसर-यवत या तीन महत्त्वपूर्ण उन्नत मार्ग प्रकल्पांना गती दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पांतून शासनाला अनुक्रमे ५००, ३०० आणि १५० कोटी असा एकूण ९५० कोटी रुपयांचा आगाऊ निधी प्राप्त होणार आहे. या प्रकल्पांमुळे पुण्याची वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल, असेही ते म्हणाले.

गणेश कला क्रीडा मंच येथे पुणे – शिरुर, तळेगाव – चाकण – शिक्रापूर, हडपसर – यवत या ३ उन्नत मार्गांच्या प्रकल्पांच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय परिवहन व रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर व हडपसर-यवत या तीन महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीवर व विशेषतः औद्योगिक वसाहतींना जोडणाऱ्या रस्त्यांवरील समस्येवर कायमस्वरूपी उपाय मिळणार आहे. भविष्यातील सार्वजनिक वाहतुकीचा वेध घेत या तिन्ही उन्नत मार्गांवरून पुढील काळात मेट्रो नेण्याचे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

या उन्नत मार्गांवरच भविष्यात मेट्रो मार्गिका उभारण्यासाठी आतापासूनच आवश्यक ती डिझाईन तयार केली आहे. यामुळे भविष्यात जेव्हा मेट्रोचे काम सुरू होईल, तेव्हा कोणताही अडथळा निर्माण होणार नाही व या एकत्रित रचनेमुळे मेट्रोच्या खर्चात किमान ४० टक्क्यांची बचत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नव्या पुरंदर विमानतळाशी जोडणी (कनेक्टिव्हिटी) वाढविण्यावरही शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवेघाटामध्ये दुहेरी बोगदा तयार करून त्यातून रस्ता व मेट्रो नेल्यास पुरंदर विमानतळावर पोहोचण्याचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल व विनाअडथळा प्रवास शक्य होईल, यादृष्टीने विचार सुरु आहे. या विमानतळासाठी ५० टक्क्यांहून अधिक भूसंपादन पूर्ण झाले असून, देशाच्या इतिहासात इतक्या वेगाने भूसंपादन होण्याचा हा विक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच १७३ किलोमीटरचा बाह्य व ८६ किलोमीटरचा अंतर्गत वर्तुळाकार रस्ता (रिंग रोड) दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून यामुळे शहरातील वाहतूक कोंडी ३० टक्क्यांनी कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पुणे व पीएमआरडीए क्षेत्राच्या पुढील ३० ते ४० वर्षांच्या विकासाचा विचार करताना पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यावश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. वाढती लोकसंख्या लक्षात घेता केवळ पाण्याचे नवे स्रोत शोधण्यावर अवलंबून न राहता, वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यावर शासनाने भर दिला आहे. जायका व जागतिक बँकेच्या सहकार्याने अनेक जलशुद्धीकरण प्रकल्प (एसटीपी) उभारण्यात येत असून, नद्या व तलावांना प्रदूषित करणारे शहरी सांडपाणी शुद्ध करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविल्या जात असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

पुणे शहर हे अभियांत्रिकी व नवउद्यमांचे (स्टार्टअप) प्रमुख केंद्र असून पुढील काळात ते अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) व जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख हब बनेल. देशातील एकूण जीसीसीपैकी जवळपास ३५ टक्के केंद्रे एकट्या पुण्यात उभी राहत आहेत. इतर शहरांसारखी पुण्याची वाहतूक कोंडीची अवस्था होऊ नये, यासाठी हे सर्व प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण केले जातील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले, पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची गंभीर समस्या दूर करण्यासाठी पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि हडपसर-यवत हे तीन उन्नत मार्गांचे प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादनाची मोठी अडचण असल्याने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे उन्नत मार्ग उभारले जात आहेत. या तिन्ही प्रकल्पांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असून, त्यामुळे पुण्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रकल्पांच्या उभारणीसाठी राज्य शासनाने दिलेल्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल गडकरी यांनी समाधान व्यक्त केले. या प्रकल्पांमध्ये वापरण्यात येणाऱ्या पोलाद आणि सिमेंटवरील राज्य शासनाच्या हिश्श्याचा वस्तू व सेवा कर माफ करण्यात आला आहे. तसेच, वाळू, खडी आणि अन्य बांधकाम साहित्यावरील स्वामित्व धन माफ करण्याबरोबरच भूसंपादन प्रक्रियेलाही शासनाने मोठे सहकार्य केले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळेच या प्रकल्पांना अपेक्षित गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

रस्ते आणि पुलांच्या बांधकामात जागतिक दर्जाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जात असल्याचे श्री.गडकरी यांनी सांगितले. मलेशियामध्ये विकसित करण्यात आलेल्या 'अल्ट्रा हाय परफॉर्मन्स फायबर रिइन्फोर्समेंट कॉंक्रिट' या तंत्रज्ञानामुळे पुलांतील दोन खांबांमधील अंतर ३० मीटरवरून १२० मीटरपर्यंत वाढविणे शक्य झाले आहे.